लोकमत

## 'दिव्यत्वाची हीच प्रचिती' पुस्तकाचे प्रकाशन



**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकन्ना लिखित 'दिव्यत्वाची हीच प्रचिती' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, तर प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजुरे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, औरंगाबाद येथील झेडेक्स कॅडिलाचे उपाध्यक्ष निलकंठ कबाडे, सिद्धेश्वर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अॅड. दीपक आलुरे, जवाहर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, भगीरथ कुलकर्णी, महादेवाप्पा आलुरे, मारुती खोबरे, धनराज मुळे, सिद्धप्पा धमुरे, विक्रम आलुरे, माणिकराव आलुरे, काशीनाथ शेटे, सुभद्राबाई मुळे, चंद्रशेखर आलुरे आदी उपस्थित होते. या पुस्तकात दिवंगत शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक कार्याचे विविध पैलू व त्यांच्या समाजोपयोगी कार्याचा आढावा डॉ. अनिता मुदकन्ना यांनी घेतला आहे. प्रास्ताविक लेखिका डॉ. अनिता मुदकन्ना, सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी केले. आभार डॉ. वैष्णवी लंगडे यांनी मानले.

Hello Osmanabad
Page No. 4 Jan 10, 2023
Powered by: erelego.com



## 'दिव्यत्वाची हीच प्रचिती' पुस्तकाचे प्रकाश

**अणदूर, दि. १० जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालया माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकन्ना लिखीत 'दिव्यत्वाची प्रचिती' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्र अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण हे होते तर प्रमुख पाहुणे म सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, सिध साखर कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी, जेष्ठ समाजसे डॉ. सिद्रामप्पा खजूरे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ उमा चनशेट्टी, सरपंच रामचंद्र आलुरे, निलकंठ कबाडे, दिपक आ उपप्राचार्य डॉ. मल्लीनाथ लंगडे, भगीरथ कुलकर्णी, महादेव आलुरे, काशिनाथ शेटे, चंद्रशेखर आलुरे यांची प्रमुख उपस्ि होती. दिव्यत्वाची हीच प्रचिती या पुस्तकामध्ये दिवंगत शिक्षणम सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आध्यात्मिक कार्याचे विविध पैलू व त्यांच्या समाजोपयोगी काय आढावा डॉ. अनिता मदकन्ना यांनी घेतला आहे

# सि.ना.आलूरे गुरुजी आमचे प्रेरणास्थान : धर्मराज काडादी



**शिव निर्णय/ अणदूर :** पूज्य आलुरे गुरुजी हे महाराष्ट्रातील शिक्षण सामाजिक क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्व होते सर्व सामान्य कुटुंबातील विद्यार्थी यांचे तर ते दैवत होते.

आलूरे गुरुजी आणि काडादी परिवाराचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते आज हि आहेत सि .ना. आलुरे गुरुजी आमचे प्रेरणास्थान असे विचार धर्मराज काडादी यांनी सि.ना . आलुरे गुरुजी यांच्या जीवन प्रा.डॉ.अनिता मुदकना यांनी लिहिलेल्या पुस्तक प्रकाशन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मांडले आहे.

अणदूर ता.तुळजापूर येथील जवाहर महाविघालयातील प्रा.डॉ. अनिता मुदकना यांनी लिहिलेल्या दिव्यत्वाची हीच प्रचिती या सि.ना. आलूरे गुरुजी यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ हुतात्मा स्मारक येथील सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी मंत्री मधुकरराव चव्हाण मुख्य अतिथि म्हणून सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.ईरेश स्वामी , धर्मराज काडादी , अणदूरचे सरपंच रामचंद्र आल-ुरे , डॉ.सिद्रामप्पा खजूरे ,निलकंठ कबाडे उपस्थित होते.

यावेळी ईरेश स्वामी यांनी आलुरे गुरुजी यांच्या सोबतच्या अनेक आठवणी सांगीतले तर अध्यक्षीय समारोप करताना मा.मधुकरराव चव्हाण यांनी दहा वर्षापासून माझी आणि आल-ुरे गुरुजी यांची मैत्री होती असे सांगीतले गुरुजींचे जीवन कार्य त्यांचे चरित्र लिहित असताना सर्वक्षेत्रात त्यानी केलेल्या कामाची नोंद होणे गरजेचे आहे . गुरुजी उत्तम शेतकरी सुद्धा होते. याची हि माहिती दिली , या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, अड दिपक आलुरे , जवाहर महाविद्यालयाचे उपप्राचार्य लंगडे, भगीरथ कुलकर्णी, महादेवप्पा आलुरे, मारुती खोबरे गुरुजी, विक्रम आलुरे, माणिक आलुरे, सुभद्राबाई मुळे , धनराज मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ.अनिता मुदकना यांनी केले तर आभार कु.वैष्णवी लंगडे यांनी मानले . या कार्यक्रमास अणदूर व पंचक्रोशीतील अनेक मान्यवर सेवानिवृत्त शिक्षक , नागरीक ,महिला मोठ्या संख्येनी होते .

दिव्य मराठी

# 'जवाहर'मध्ये साने गुरुजी राज्यस्तरीय अधिवेशन, तयारीचा आढावा

प्रतिनिधी | अणदूर

येथील शिक्षण प्रसारक मंडळ व अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला शाखा, अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय साने गुरुजी राज्यस्तरीय कथामाला अधिवेशन जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणात २८ व २९ रोजी होणार आहे. यानिमित्त महाविद्यालयात नियोजनाची पहिली बैठक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय प्रमुख कार्यवाहक सुनिल पुजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

या बैठकीत शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचालित सर्व शाखांचे मुख्याध्यापक, मराठी विषयाचे शिक्षक, प्राध्यापकांची उपस्थिती होती. हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी स्वागत समिती, भोजन समिती, निधी संकलन समिती, नियोजन समिती, अतिथी स्वागत, निवास व्यवस्था, ग्रंथदिंडी, विविध कलागुणांचे सादरीकरण अशा विविध समित्या स्थापन करून चर्चा करण्यात आली. यावेळी शिक्षणमहर्षी स्वर्गीय सि. ना. आलुरे गुरूजींच्या मनातील भव्यदिव्य अधिवेशन मोठ्या दिमाखात होणे अपेक्षित आहे, अशी भावना मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सुनिल पुजारी यांनी व्यक्त केली. या बैठकीस मुख्याध्यापक राजकुमार ठोंबरे, मंगेश अणदूरकर, किरण कुलकर्णी, सतीश कदम, रवींद्र उपासे, मनोहर घोडके, सुभाष माशाळकर, शेख, जयंत जाधव, शिक्षक कैलास बोंगरगे, गुलाब सय्यद, संजय घटे, बाळासाहेब बागडे, किरण गायकवाड, प्रा. विष्णू पाटील, प्रा. महेश वाघ, प्रा. एम. बी. बिराजदार, संजय कुलकर्णी, प्रमिला सलगरे, संध्या जाधव, खताळ उपस्थित होते.

# फुलवाडी येथे जवाहरच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन

पुण्य नगरी | वृत्तसेवा

**अणदूर:** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने फुलवाडी येथे आयोजित रासेयो शिबिराचे उद्घाटन सरपंच छाया लोहार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामचंद्र आलुरे, मारुती खोबरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, नागनाथ हांडगे, मधुमती धबाले, सदस्य गुरुराज हांडगे, श्रीकृष्ण गायकवाड, नागरबाई हिप्परगे, ग्रामसेविका पी. के. देशमाने, रेखा हांडगे, मुख्याध्यापक डी. जी. शिदोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे डॉ. अनिता मुदकन्न यांची प्रमुख उपस्थिती होती.

दैनिक संघर्ष

शुक्रवार दि. १३/०१/२०२३

# प्रा.मुदकण्णा यांचे दिव्यत्वाची हीच प्रचिती : पुस्तकाचे थाटात प्रकाशन

अणदूर दि. १२ (प्रतिनिधी) येथील जवाहर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या तथा प्रा.डॉ.अनिता मुदकण्णा यांनी आलुरे गुरुजींचे सामाजिक,शैक्षणिक व अध्यात्मिक क्षेत्रातील योगदान तसेच त्यांची जीवनशैली व कार्यशैली याबाबत विस्तृतपणे आढावा घेणारी दिव्यत्वाची हीच प्रचिती या पुस्तकाचे प्रकाशन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात करण्यात आले. लेखिकेने या पुस्तकातून गुरुजींच्या कार्याला उजाळा देऊन नव्या पिढी समोर आदर्श ठेवल्याचे सांगत सर्वच मान्यवरांनी डॉ. मुदकण्णा यांचे कौतुक केले. येथील हुतात्मा स्मारकात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.इरेश स्वामी, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजुरे,सरपंच रामचंद्र आलुरे व निलकंठ कबाडे हे उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविकात बोलताना लेखिका डॉ.मुदकण्णा यांनी कै.आलुरे गुरुजींचे जीवन हे त्यागमय होते त्यामुळेच अनेकजण आज उच्च पदावर विराजमान आहेत.शिक्षणप्रेमी व विद्यार्थीप्रिय गुरुजी शिक्षण महर्षी म्हणून ओळखले जातात हा त्यांचा लौकिक असल्याचे सांगून त्यांच्या ऋणातून आम्ही मुक्त होऊ शकत नाही मात्र या पुस्तकाच्या रूपाने गुरुजींचे विचार भावीपिढी समोर ठेवून कांही अंशी उतराई होण्याचा प्रयत्न करीत असल्याचे स्पष्ट केले. यावेळी उपस्थित सर्वच मान्यवरांनी आलुरे गुरुजींच्या कार्याची महती सांगून त्यांच्या स्मृती जागवल्या. या कार्यक्रमास माजी जिप सदस्य महादेवप्पा आलुरे, खोबरे गुरुजी, सुभद्राताई मुळे, माजी मुख्याध्यापक महादेवप्पा नरे, दिपक आलुरे आदीसह प्रगती महिला मंडळ,जागर महिला मंडळ व प्रभात मंडळाचे सदस्य,जवाहर विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक वृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येनी उपस्थित होते. कु.वैष्णवी लंगडे यांच्या आभाराने कार्यक्रमाची सांगता झाली.



दिव्य मराठी उस्मानाबाद, शुक्रवार, १३ जानेवारी २०२३ | ३

# 'दिव्यत्वाची हिची प्रचिती' पुस्तकाचे प्रकाशन



प्रतिनिधी | अणदूर

शिक्षणमहर्षी स्व. सि. ना. आलुरे गुरुजी यांचा जीवनपट उलगडणाऱ्या प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा लिखित 'दिव्यत्वाची हिच प्रचिती' या पुस्तकाचे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजुरे, सरपंच रामचंद्र आलुरे व निलकंठ कबाडे उपस्थित होते. प्रास्ताविकात लेखिका प्रा. डॉ. मुदकण्णा म्हणाल्या की, आलुरे गुरुजींचे जीवन त्यागमय होते. या पुस्तकाच्या रुपाने गुरुजींची विचार भावी पिढीसमोर ठेवून त्यांच्या ऋणातून काशी अंशी उतराई होण्याचा प्रयत्न आहे. कार्यक्रमास माजी झेडपी सदस्य महादेवप्पा आलुरे, खोबरे गुरुजी, सुभद्राताई मुळे, माजी मुख्याध्यापक महादेवप्पा नरे, दिपक आलुरे, प्रगती व जागर महिला मंडळ व प्रभात मंडळाचे सदस्य, जवाहर विद्यालय व उच्च माध्य. विद्यालयाचे शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते. वैष्णवी लंगडे यांच्या आभाराने कार्यक्रमाची सांगता झाली. वक्त्यांनी मनोगतात आलुरे गुरुजींच्या जीवनातील विविध प्रसंगाची आठवण करत त्यांचे राहणीमान व कडक शिस्तीचा उल्लेख केला. माजी मंत्री चव्हाण म्हणाले की, आलुरे गुरुजींनी विद्यार्थ्यांनाच आपली मुले मानून त्यांना वेळोवेळी मदत केली. गुरुजी हे केवळ शैक्षणिक गुरुजी नव्हते तर ते सर्वच क्षेत्रातील गुरुजी होते. आयोजक उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तम नियोजन केले होते.

हिंदवी बाण्याचे मराठी दैनिक
शिव निर्णय
DAILY SHIV NIRNAY
RNI No.-MAHMAR/2020/79125

# जवाहर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास फुलवाडी येथे प्रारंभ



शिव निर्णय/इटकळ : तुळजापुर तालुक्यांतील फुलवाडी येथे दि. १७ जानेवारी २०२३ शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास विशेष शिबिर प्रारंभ झाला. शिबिराचे उद्धाटन फुलवाडीचे सरपंच सौ. छाया यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे उपस्थित होते. सदस्य मारुती खोबरे, प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे, माजी सरपंच नागनाथ हांडगे उपसरपंच सौ मधुमती धबाले, सदस्य गुरुराज हांडगे, मुख्याध्यापक, डी.जी.शिंदोरे कार्यक्रमाधिकारी डॉ.सूर्यकांत आगलावे डॉ.अनिता मुदक ना यांची प्रमुख उपस्थिती होती अध्यक्षीय समारोप करताना रामचंद्र आलुरे म्हणाले की,बालविवाह, अंधश्रद्धेवर विजय मिळवू या व्यसनाधीनता समाजाला लागलेलं कीड आहे.व्यसनमुक्त होऊन आरोग्य संपन्न होऊ या,वृक्षारोपण करून पर्यावरण संतुलन करू, झाड आपल्याला देतात, निसर्ग हा आपला सोबती आहे. झाडांबरोबर राहू या.ग्रामस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन करून गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन शिबिर यशस्वी करू या असे आवाहन केले.या उद्धाटन समारंभास गावातील प्रतिष्ठित नागरिक राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.डॉ.राजशेखर वरशेट्टी, प्रा.डॉ.सुनील रजपूत, प्रा.दयानंद कांबळे,नामदेव काळे यांचे सहकार्य लाभले सूत्र संचालन प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार आभार प्रा.डॉ.आगलावे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनेश सलगरे प्रतिनिधी इटकळ

पुरोगामी विचाराचे
**एकमत**
page- 6
25 Jan 2023

**हळदी-कुंकू कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद । जवाहर महाविद्यालयाच्या एनएसएस शिबिराचा समारोप**

# मन प्रसन्न ठेऊन जो कार्य करतो तो यशस्वी होतो : आलुरे

**अणदूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजनेतील सात दिवस हे स्वतःला बदलण्यासाठी आहेत, ही जन्माची शिदोरी आहे, उभ्या आयुष्यासाठी उपयोगी आहे. स्वतःला प्रश्न विचारा, सूर्योदया अगोदर उठणारा खरा तरुण असतो. मन प्रसन्न ठेवून जो कार्य करतो तो यशस्वी होतो आळसास मुळी न थारा, आळस झटका, अभिमानाचे विसर्जन करून स्वाभिमान जतन करा, समाजात पुस्तकापेक्षा माणूस वाचणे फार महत्त्वाचे आहे. वैऱ्याचा सुद्धा सन्मान करायला शिका असे अनमोल मार्गदर्शन प्रमुख पाहुणे रामचंद्र आलुरे यांनी शिबीर समारोपप्रसंगी सोमवारी (दि.२३) केले. शिक्षण




प्रसारक मंडळ, अणदूर संचलित, जवाहर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप समारंभ सोमवारी (दि.२३) झाला. अध्यक्षस्थानी फुलवाडीचे माजी सरपंच नागनाथ हांडगे, माजी सरपंच सुभाष हिप्परगे, सातलिंग बोगरगे, तुळजापूरचे चंद्रकांत लोहार, ग्रामसेविकास पी. के. देशमाने अणदुर ग्रामपंचायत सदस्य गणेश सूर्यवंशी, फुलवाडी ग्रामपंचायत सदस्य, गुरुराज हांडगे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, मुख्याध्यापक, प्रा. सुरेश ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ग्रामसेविका पी. के. देशमाने कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिता मुदकना, प्रा. सुरेश ठोंबरे प्राचार्य, डॉ. उमाकांत चनशेट्टी इत्यादींनी विचार व्यक्त केले. प्राचार्य चनशेट्टी म्हणाले की, सेवा केल्याने व्यक्तिमत्व उजळून निघते. संघ भावना व जबाबदारीचे जाणीव होते. राष्ट्र बळकटीसाठी हे आवश्यक आहे. सुप्त गुणांना वाव देण्यासाठी पुढे या. व्यक्तिमत्व विकास करा असे आवाहन केले. अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी केले. भक्ती होगाडे, फौजीया टीनवाले, मिथुन राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. शिबिरासाठी डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. सुनील रजपूत, डॉ. मानसी स्वामी, डॉ. उमाकांत सलगर, प्रा. विवेकानंद वाहुळे, नामदेव काळे यांचे योगदान लाभले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार व आभार प्रा. दयानंद कांबळे यांनी मानले.

**लोकमत**

# बालविवाह प्रतिबंधासाठी सर्वांच्या पुढाकाराची गरज : प्रज्ञा बनसोडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** लहान वयात मुलांचे लग्न झाल्याने त्यांचे आरोग्य, मानसिकता व विकासावर परिणाम होतो. प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होतो. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने बालविवाह प्रतिबंधासाठी पुढाकार घेऊन याबाबत जाणीव जागृती करणे गरजेचे आहे, असे मत जिल्हा बालसंरक्षण विभागाच्या सामाजिक कार्यकर्त्या प्रज्ञा बनसोडे यांनी व्यक्त केले.

तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी येथे जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने आयोजित रासेयो शिबिरात 'बालविवाह प्रतिबंधक ही काळाची गरज' या विषयावर त्यांचे मार्गदर्शन झाले. अध्यक्षस्थानी उपसरपंच मधुमती धबाले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. संतोष पवार, जिल्हा महिला बालविकास कार्यालयाच्या समुपदेशक शारदा गंडले, माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. एस. आर. भारती, पोलिस पाटील रेखाताई हांडगे, आशा कार्यकर्ती शकुंतला लंगडे, मुख्याध्यापक धुळाप्पा शिदोरे, अंगणवाडी सेविका मंगल जेटे, सुजाता हांडगे, सहशिक्षिका सुनीता ढेपे, मीना बनसोडे उपस्थित होते.

यावेळी डॉ. संतोष पवार, शारदा गंडले, डॉ. अनिता मुदकन्ना यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बालविवाह प्रतिबंधासाठी सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली. सूत्रसंचालन फौजीया टिनवाले, प्रास्ताविक देवकी मोळगडे यांनी केले. आभार शिल्पा राठोड यांनी मानले. यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे, माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकन्ना, डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. सुनील राजपूत, डॉ. मल्लीनाथ बिराजदार, डॉ. मानसी स्वामी, डॉ. दीपा कलशेट्टी, डॉ. ज्योती हत्तरगे, डॉ. एम. एन. गडसिंग आदींनी पुढाकार घेतला.

Hello Osmanabad
Page No. 4 Jan 24, 2023
Powered by: erelego.com

# हॅलो मेडिकल व जवाहर महाविद्यालयाच्या वतीने सर्व रोग निदान शिबिर

**शिव निर्णय**/ अणदूर : हॅलो मेडिकल फाउंडेशन अणदूर व जवाहर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे फुलवाडी येथे रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन फुलवाडी चे माजी सरपंच नागनाथ हांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. सुनिता चकरवार, कविता राठोड, लक्ष्मी दुपारगुडे, गुलाब जाधव, श्रीकांत अणदूरकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे, डॉ. अनिता मुदकन्ना, आशा कार्यकर्त्या शकुंतला लंगडे, ग्रामपंचायत सदस्य गुरुराज हांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व रोग निदान शिबिरात ६० जनांची शुगर तपासणी, ७० रुग्ण तपासणी व औषधोपचार करण्यात आले.

या सर्व रोग निदान शिबिरास प्रा. दयानंद कांबळे, प्रा. महेश कांबळे, विनोद हिप्परगे शिवानंद रिंगणे, हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या नर्सिंगचे विद्यार्थी यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिरात शिबिरार्थी विद्यार्थी विद्यार्थिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने होते.



लोकमत

साने गुरुजी कथामालाच्या राष्ट्रीय अधिवेशनास उत्साहात प्रारंभ

# वारकरी दिंडी, महापुरुषांच्या वेशभूषांनी वेधले अणदूरकरांचे लक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर** : तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे अखिल भारतीय साने गुरूजी कथामाला राष्ट्रीय कार्यकारिणी आणि येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साने गुरूजी कथामालाच्या राष्ट्रीय अधिवेशनास शनिवारी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. यानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथ दिंडीतील वारकरी दिंडी, विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध महापुरूषांच्या वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या.

या अधिवेशनानिमित्त सकाळी आठ ते अकरा या वेळेत ही ग्रंथ दिंडी काढण्यात आली. त्यामध्ये वारकरी दिंडी, विविध राष्ट्रभूषा वेशभूषा, ग्रामीण साहित्य, मल्हार मार्तडांची वेशभूषा, सोलापूर सिद्धरामेश्वर काठी सोहळा, विविध राष्ट्रीय गीते, पंढरपूरच्या विठ्ठरायाची दिंडी, रिंगण सोहळा, आई तुळजाभवानी मातेच्या रूपातील विविध गीते, गोंधळी गीते सादर करण्यात आली. यामुळे अणदूरनगरी फुलून गेली होती. यावेळी यशवंतराव टेकाळे, शामराव कराळे, डी. के. कुलकर्णी, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, पन्नालाल सुराणा, प्राणीमित्र विलासभाई शहा, अशोक म्हमाणे, यशवंतराव पाटणे, अशोक खानापुरे, सुनील पुजारी, मारूतराव खोबरे, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, डी. के. देशमुख, व्ही. जी. पाटील, टेकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## 'श्यामची आई' एक संस्कारपीठ

यावेळी जेष्ठ साहित्यिक यशवंतराव पाटणे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, गुरुजी हे फक्त गुरुजी नव्हते तर संस्कारपीठ होतं. पुस्तकातुन मस्तक सुधारतं. साने गुरुजींची 'श्यामची आई' हे एक संस्कारपीठच असून, साने गुरुजींचे संस्कार जर विद्यार्थ्यांनां मिळाले तर तो जीवनात यशस्वी होतो. भारत संस्कृतिपूर्ण देश असून, संस्कृती निर्माण करण्यासाठीच हे साने गुरुजी कथामाला अधिवेशन भरले आहे. नम्रता आपणाकडे येण्यासाठी संस्कार जपा, जीवनातील सिध्दांत जगा, चांगले संस्कार मुलांमध्ये रुजवा. आईच्या जबाबदाऱ्या जाणून मुलांनां संस्कारशील बनवा. मुलांच्या मनातील स्वप्ने ओळखा. मुलांना समजून घ्या, असे आवाहन त्यांनी केले.



अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष रामचंद्र आलुरे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेचे प्रमुख रामचंद्र आलुरे यांना कथामाला समितीच्या वतीने समाजभूषण हा पुरस्कार देऊन सपत्नीक सन्मानित करण्यात आले. या अधिवेशनात परभणी येथील मधुकर उमरीकर यांनी ' शामची आई ' हा एकपात्री प्रयोग सादर करुन श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतले, रात्री विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. अधिवेशनात जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागातून अखिल भारतीय साने गुरूजी कथामालेचे कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रास्ताविक लिंबराज सुरवसे, सूत्रसंचलन डॉ. मल्लीनाथ बिराजदार, शिवशंकर जळकोटे यांनी केले. आभार प्रा. राजेश नळगे यांनी मानले.

Hello Osmanabad
Page No. 3 Jan 29, 2023
Powered by: erelego.com

# साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय अधिवेशन सांगता-

दैनिक आपली सत्ता.
महाराष्ट्र मुंबई उस्मानाबाद लातूर बीड,https://sattadigital.in/
30-01-2022, मुंबई , महाराष्ट्र

## साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय अधिवेशन सांगता-

**अणदूर ता.तुळजापुर येथे आज 55 वे अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता**





**बर्फ में बदल गया वासुकि**

अणदूर - अणदूर ता.तुळजापुर येथे आज 55 वे अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता (29 जानेवारी)झाली.. सकाळी अधिवेशन स्थळी.. एकपात्री नाटिका..सविलताई संगपाळ, सातारा यांनी ' पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ' यावर व अपर्णाताई निरगुडे यांनी 'तीन प्रश्न'यावर कथाकथन केले.. तसेच उस्मानाबाद जिल्हा साने गुरुजी कथामाला शाखेच्या वतीने गुणवंत शिक्षकांचा सत्कार करून सन्मानित करण्यात आले..त्यामध्ये महादेव गपाट, फुलचंद कदम,संगीता शहा,मल्लिनाथ बिराजदार, सुभाष सुरवसे,राम जगताप,बसय्या स्वामी, शिवाजी पवार,संतोष अघाव, आदिनाथ पालखे, शिवाजी आवारे,सुधाकर हावळे,ज्ञानेश्वर माशाळकर,भिम सुरवसे,आशा मोरजकर,किरण गरड यांचा समावेश आहे.तसेच अधिवेशनाच्या समारोपात गंगाधर पटणे,एम.डी.देशमुख, शामराव कराळे, रामचंद्र दादा आलुरे यांनी हे राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी झाल्याचे सांगितले आणि शेवटी मान्यवरांनी साने गुरुजी यांचे विचार जगवा,मुलांना अभ्यासाचे धडे देताना संस्काराचे धडे शिकवा,कृती आणि उक्ती यात बदल होऊ देऊ नका.साने गुरूजी हे आईच्या संस्कारातुन घडले,शिकले तुम्ही सुध्दा मातृहदयी बना, मुलांच्या मनात जावा,आलुरे गुरूजींचा वसा आणि वारसा जपा. सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम, व्दितीय, तृतीय, उत्तेजनार्थ आलेल्या शाळेंना सन्मानित करण्यात आले. हे अधिवेशन यशस्वी होण्यासाठी कार्य करणाऱ्या शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला..हे राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी होण्यासाठी सर्व शाखांचे मुख्याध्यापक,शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, प्राध्यापक वृंद यांनी परिश्रम घेतले..कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.मल्लिनाथ बिराजदार, भैरवनाथ कानडे आभार श्री.लिंबाजी सुरवसे यांनी केले.

# साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता





**तभा वृत्तसेवा/श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि. २९ जानेवारी-**
अणदूर, ता. तुळजापुर येथे आज ५५ वे अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेच्या राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता झाली.

सकाळी अधिवेशन स्थळी.. एकपात्री नाटिका..सविताताई संकपाळ, सातारा यांनी ' पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ' यावर व अपर्णाताई निरगुडे यांनी 'तीन प्रश्न'यावर कथाकथन केले.. तसेच धाराशिव जिल्हा साने गुरुजी कथामाला शाखेच्या वतीने गुणवंत शिक्षकांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये महादेव गपाट, फुलचंद कदम, संगीता शहा, मल्लिनाथ बिराजदार, सुभाष सुरवसे, राम जगताप,बसय्या स्वामी, शिवाजी पवार, संतोष अघाव, आदिनाथ पालखे, शिवाजी आवारे, सुधाकर हावळे, ज्ञानेश्वर माशाळकर, भिम सुरवसे,आशा मोरजकर, किरण गरड यांचा समावेश होता.तसेच काल अमोल गुड्ड यांना शिक्षक रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते .

अधिवेशनाच्या समारोपात गंगाधर पटणे,एम.डी. देशमुख, शामराव कराळे, रामचंद्र दादा आलुरे आदी मान्यवरांनी हे राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी झाल्याचे सांगितले आणि साने गुरुजी यांचे विचार जागवा, असा संदेश दिला, सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम, व्दितीय, तृतीय, उत्तेजनार्थ आलेल्या शाळेंना सन्मानित करण्यात आले. हे अधिवेशन यशस्वी होण्यासाठी कार्य करणाऱ्या शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला. हे राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी होण्यासाठी सर्व शाखांचे मुख्याध्यापक,शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, प्राध्यापक वृंद यांनी परिश्रम घेतले..सूत्रसंचालन मल्लिनाथ बिराजदार, भैरवनाथ कानडे आभार लिंबाजी सुरवसे यांनी मानले.

# अणदूर येथे सानेगुरूजी कथामाला राष्ट्रीय अधिवेशनास उत्साहात प्रारंभ

**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**अणदूरः** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय कार्यकारिणी व शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साने गुरुजी कथामालेच्या ५५ व्या राष्ट्रीय अधिवेशनास उत्साहात प्रारंभ करण्यात आला. प्रारंभी गावातील मुख्य मार्गावरून भव्य अशी ग्रंथदिंडी काढण्यात आली.



या दिंडीत वारकऱ्यासह विविध वेशभूषा परिधान करून विद्यार्थी सहभागी झाले होते. ग्रामीण साहित्य, मल्हार मार्तंडांची वेशभुषा, सोलापूर सिध्दरामेश्वर काठी सोहळा, विविध गीते, पंढरपूरच्या विठुरायाची दिंडी, रिंगण सोहळा, आई तुळजाभवानी मातेच्या रूपातील विविध गीते, गोंधळी गीतांनी यावेळी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

या अधिवेशनाचे उद्‌घाटन माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमास शामराव कराळे, यशवंतराव टेकाळे, डी.के.कुलकर्णी, पन्नालाल सुराणा, विलासभाई शहा, अशोक म्हमाणे, यशवंतराव पाटणे, अशोक खानापुरे, सुनिल पुजारी, मारूती खोबरे, लक्ष्मीकांत पाटील, डी. के. देशमुख, व्ही.जी.पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात रामचंद्र आलुरे यांना कथामाला समितीच्या वतीने समाजभूषण पुरस्कार सपत्नीक देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात कथामालेचे राष्ट्रीय अध्यक्ष शामराव कराळे म्हणाले, गुणवंत व आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यासह ग्रंथदिंडी, कार्यक्रमाचे उत्तम नियोजन संस्थेने केले आह. साने गुरुजींचे उत्तम संस्कार आपण जपत आहात. उर्दू शाळेतील शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तेथे साने गुरुजी यांच्या प्रार्थना म्हणल्या जातात.साने गुरुजींचे संस्कार जपा, घराघरात श्यामची आई पोहचवा,आदरतिथ्य जपा,गुरूजींचा वसा आणि वारसा असाच चालवा असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मल्लिनाथ बिराजदार तर आभार शिवशंकर जळकोटे यांनी मानले.

पुरोगामी विचाराचे
लोकमत
page- 8
01 Feb 2023

विसूभाऊ बापट । अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन

# पाठांतर म्हणजे एकाग्रता साधण्याची कला

**अणदूर : वार्ताहर**

पाठांतर म्हणजे घोकंपट्टी नाही तर पाठांतर म्हणजे एकाग्रता साधण्याची कला आहे. मातृभाषा आणि मातृप्रेम जपत देशसेवा करूया, आज संयुक्त कुटुंब पद्धती समाप्त होत असताना दिसत आहे, असे प्रतिपादन विसूभाऊ बापट यांनी व्यक्त केले. येथील जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी ते बोलत होते.

उद्घाटक म्हणून मुंबईचे कुटूंब रंगला काव्यातचे सादर करते विसूभाऊ बापट उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे सदस्य, मारूती खोबरे, डॉ. उमाकांत चनशेटी, डॉ. मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात शिक्षण महर्षी सि. ना. आलुरे गुरूजी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.



उद्घाटनपर विचार व्यक्त करताना बापट म्हणाले, सौंदर्यपूर्ण अविष्कार म्हणजे कविता. हे भावना, उत्कटता, सौंदर्य या स्वप्नातून प्रवास करत असते. पाठांतर म्हणजे घोकंपट्टी नाही तर पाठांतर म्हणजे एकाग्रता साधण्याची कला आहे. मातृभाषा आणि मातृप्रेम जपत देशसेवा करूया, आज संयुक्त कुटुंब पद्धती समाप्त होत असताना दिसत आहे. कुटूंब रंगला काव्यात या माध्यमातून अनेक कवितांचे वाचन आणि गायन करून विद्यार्थी रसिकांना मंत्रमुग्ध केले.रखुमाई रुसली कोपऱ्यात बसली. प्रेम कर भिल्लासारखं मातीमध्ये खोचून देखील मेघापर्यंत पोहोचलेलं, ऊन ऊन खिचडी साजूक तूप, वेगळं व्हायचं भारीच हाऊस, दोघात तिसरा म्हणजे डोळ्यात कचरा. जुने जाऊ द्या मरणा लागुनी. सौंदर्याची व्याख्या करणं अवघड असते. खुर्ची म्हणाला टेबलाला आपण दोघं लग्न करू, दोन कानडी कानडीत बोलतात, दोन सिंधी सिंधीत बोलतात, दोन मराठी मात्र हिंदीत बोलतात. मातृभाषेला कमी लेखू नका मम्मी, पप्पा ऐवजी आई म्हणा कारण आई या अक्षरात आत्मा आणि ईश्वर यांचा संगम आहे तेथेच आई जन्माला आली. आईला विसरू नका, असे आवाहन करत शेवटी बलसागर भारत होवो, विश्वात शोभून राहो या गीताने कुटूंब रंगला काव्यातचा समारोप केला.

कार्यक्रमास सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक, जवाहर विद्यालय, महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तेजस कंदले व सागर पांचाळ यांनी तबल्यावर साथ दि ली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर विचार प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेटी यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. मल्लिनाथ बिराजदार तर आभार डॉ. अनिता मुदकना यांनी मानले. यावेळी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
01 Feb 2023 - Page 5



## २फेब्रुवारीला तुळजापुरात जागर भक्तीचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३१ जानेवारी-**

२ फेब्रुवारी रोजी अणदूर येथे बसस्थानक ते गणेश मंदिर दरम्यान ब्रह्मचारी देवव्रत स्वामीजी व ज्ञानेश्वर स्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली पदयात्रा घेण्यात आले. वारकरी,महिला पुरुष नागरिकांनी मोठी उपस्थित होती.

रविशंकरजी यांच्या उपस्थितीत तुळजापूर येथे २ फब्रुवारी रोजी जागर भक्तीचा आयोजन केले असूनया निमित्ताने गावोगावी प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पदयात्रा, पूजा व सत्संगाचे आयोजन करण्यात येत आहे. डॉ जितेंद्र कानडे, लक्ष्मण नरे, कमलाकर घुगे, दयानंद मुडके, श्रीशैल आलूरे, शिवराज भुजबळ, संतोष मोकाशे, रामेश्वर सावंत, दादाराव घोडके, शशिकांत परमेश्वर, आशिष बोराडे, सुधीर बिक्कड, दशरथ शिंदे, भजनी मंडळ, नागरिक, महिला उपस्थित होत्या.

## जवाहर कॉलेजच्या प्रांगणात 'कुटुंब रंगलं काव्यात'चा बहारदार कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३१ जानेवारी-**

जवाहर महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे उदघाटन कवी विसुभाऊ बापट यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे ,सदस्य, मारुती खोबरे गुरुजी प्राचार्य,डॉ. उमाकांत चनशेटी, उपप्राचार्य, डॉ. मल्लिनाथ लंगडे उपस्थित होते.



विसूभाऊ बापट यांनी कुटुंब रंगला काव्यात या माध्यमातून अनेक कवितांचे वाचन आणि गायन करून विद्यार्थी रसिकांना मंत्रमुग्ध केले.रखुमाई रुसली कोपऱ्यात बसली.प्रेम कर भिल्लासारखं मातीमध्ये खोचून देखील मेघापर्यंत पोहोचलेलं, ऊन ऊन खिचडी साजूक तूप, वेगळं व्हायचं भारीच हाऊस, दोघात तिसरा म्हणजे डोळ्यात कचरा.जुने जाऊ द्या मरणा लागुनी. सौंदर्याची व्याख्या करणं अवघड असते. खुर्ची म्हणाला टेबलाला आपण दोघं लग्न करू, दोन कानडी कानडीत बोलतात,दोन सिंधी सिंधीत बोलतात, दोन मराठी मात्र हिंदीत बोलतात. मातृभाषेला कमी लेखू नका मम्मी, पप्पा ऐवजी आई म्हणा कारण आई या अक्षरात आत्मा आणि ईश्वर यांचा संगम आहे.तेथेच आई जन्माला आली. आईला विसरू नका. असे आव्हान करत शेवटी बलसागर भारत होवो, विश्वात शोभून राहो. या गीताने समारोप केला.

या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित बंधू भगिनी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक, जवाहर विद्यालयाचे विद्यार्थी, महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तेजस कंदले व सागर पांचाळ यांनी तबल्यावर साथ दिली.

# जवाहर कॉलेजच्या प्रांगणात 'कुटुंब रंगलं काव्यात'चा बहारदार कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३१ जानेवारी-** जवाहर महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे उदघाटन कवी विसुभाऊ बापट यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे ,सदस्य, मारुती खोब्रे गुरुजी प्राचार्य,डॉ. उमाकांत चनशेटी, उपप्राचार्य, डॉ. मल्लिनाथ लंगडे उपस्थित होते.

विसूभाऊ बापट यांनी कुटुंब रंगला काव्यात या माध्यमातून अनेक कवितांचे वाचन आणि गायन करून विद्यार्थी रसिकांना मंत्रमुग्ध केले.रखुमाई रूसली कोपऱ्यात बसली.प्रेम कर भिल्लासारखं मातीमध्ये खोचून देखील मेघापर्यंत पोहोचलेलं, ऊन ऊन खिचडी साजूक तूप, वेगळं व्हायचं भारीच हाऊस, दोघात तिसरा म्हणजे डोळ्यात कचरा.जुने



जाऊ द्या मरणा लागुनी. सौंदर्याची व्याख्या करणं अवघड असते. खुर्ची म्हणाला टेबलाला आपण दोघं लग्न करू, दोन कानडी कानडीत बोलतात,दोन सिंधी सिंधीत बोलतात, दोन मराठी मित्र हिंदीत बोलतात. मातृभाषेला कमी लेखू नका मम्मी, पप्पा ऐवजी आई म्हणा कारण आई या अक्षरात आत्मा आणि ईश्वर यांचा संगम आहे.तेथेच आई जन्माला आली. आईला विसरू नका. असे आव्हान करत शेवटी बलसागर भारत होवो, विश्वात शोभून राहो. या गीताने समारोप केला.

या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित बंधू भगिनी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक, जवाहर विद्यालयाचे विद्यार्थी, महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तेजस कंदले व सागर पांचाळ यांनी तबल्यावर साथ दिली.

# अणदुरच्या जवाहर महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

अणदूर /प्रतिनिधी–
येथील जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मंगळवार दि.३१ रोजी कुटुंब रंगला काव्यात चे सादरकर्ते विसुभाऊ बापट,मुंबई यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामचंद्र आलुरे हे होते तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेटी, उपप्राचार्य, डॉ.मल्लिनाथ लंगडे, माजी मुख्याध्यापक मारुती खोबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दै.संघर्ष



या कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण महर्षी सि.ना.आलुरे गुरुजी यांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलित करून करण्यात आले. उद्घाटनपर बोलताना विसूभाऊ बापट म्हणाले की, सौंदर्यपूर्ण अविष्कार म्हणजे कविता,पाठांतर म्हणजे घोकंपट्टी नाही तर पाठांतर म्हणजे एकाग्रता साधण्याची कला आहे. आई या अक्षरात आत्मा आणि ईश्वर असल्याचे सांगून मातृभाषा आणि मातृप्रेम जपत देशसेवा करा असे आवाहन करून आज संयुक्त कुटुंब पद्धती संपत चालल्याची **पुढे पान ७ वर**

दैनिक संघर्ष उस्मानाबाद दि.३०/१/२०२३ ७

# अणदूरात दोन दिवसीय राष्ट्रीय कथामाला अधिवेशनाची सांगता



अणदूर/प्रतिनिधी

येथील अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला ५५ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा प्रारंभ शनिवार दि.२८ रोजी ग्रंथदिंडी व बालआनंद मेळाव्याने करण्यात आला. व्यासपीठावरील अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थित उद्घाटन करण्यात आले तर रविवार दि.२९ रोजी अधिवेशनाची सांगता झाली.

येथील जवाहर महाविद्यालयात झालेल्या या अधिवेशनाचे शनिवार (दि.२८) रोजी सकाळी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कथामालेचे राष्ट्रीय अध्यक्ष शामराव कराळे हे होते तर स्वागताध्यक्ष रामचंद्र आलुरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रारंभी साने गुरुजी व आलुरे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पुजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जेष्ठ विचारवंत पन्नालाल सुराणा, जेष्ठ साहित्यीक प्राचार्य यशवंत पाटणे सातारा, अ‍ॅड लक्ष्मीकांत पाटील, प्रमुख कार्यवाह सुनील पुजारी, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, अणदूर शाखा अध्यक्ष शिवाजी सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य पाटणे यांनी आपल्या ओघवत्या भाषणात आज आमची आई स्वतःमधेच हरवली असून सापेपणात सौंदर्य आहे हे विसरल्याने तिला मुलाकडे लक्ष देण्यास वेळ नसल्याची खंत व्यक्त करून माणूस भौतिक सुखाच्या मागे लागला आहे तर मूल्यहीन राजकारणामुळे लोकशाही व संविधानाला तडे जात असल्याची भिती व्यक्त केली. लोककल्याणाची साधने ज्यांच्याकडे आहेत त्यांनी भविष्याचा वेध घेऊन कार्य केले पाहिजे असा मार्मिक सल्लाही दिला. पाटणे यांच्या अमोघ वाणीने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. याच कार्यक्रमात प्रेरणा विशेषांकाचे प्रकाशन तसेच पुरस्कार वितरण करण्यात आले. संजय आवटे, पुणे यांच्या या गांधींचं करायचं काय? या विषयावर व्याख्यान झाले. दुपारच्या सत्रात मधुकर उमरीकर, पुणे यांचा श्यामची आणि आजची आई या विषयावर एकपात्री प्रयोग संपन्न झाला. सांस्कृतिक कार्यक्रमानंतर कथामालेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. रविवार दि.२९ रोजी सविताताई संगपाळ, सातारा यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जिवनावर एकपात्री नाटीका सादर केली यावेळी अनेकांचे डोळे पाणावले होते. अपर्णाताई निरगुडे यांनी मतीन प्रश्नफ याविषयावर कथाकथन केले तसेच उस्मानाबाद जिल्हा साने गुरुजी कथामाला शाखेच्या वतीने गुणवंत शिक्षकांचा सत्कार करून सन्मानित करण्यात आले. यात महादेव गपाट, फुलचंद कदम, संगीता शहा, मल्लिनाथ बिराजदार, सुभाष सुरवसे, राम जगताप, बसय्या स्वामी, शिवाजी पवार, संतोष अघाव, आदिनाथ पालखे, शिवाजी आवारे, सुधाकर हावळे, ज्ञानेश्वर माशाळकर, भिम सुरवसे, आशा मोरजकर, किरण गरड यांचा समावेश आहे. अधिवेशनाच्या समारोपात माजी आमदार गंगाधर पटणे, एम.डी. देशमुख, शामराव कराळे, रामचंद्र आलुरे यांनी हे राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी झाल्याचा मनस्वी आंनद व्यक्त करून कौतूक केले. सांस्कृतिक कार्यक्रमात प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ आलेल्या शाळेंना सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात शिक्षणतज्ञ एम.डी. देशमुख यांनी भावी पिढी नीतिमूल्ये जपणारी, संस्कारक्षम व इतरांचा उद्धार करणारी असावी मात्र आज शिकलेल्या माणसाकडून समाज बांधणीची अपेक्षा फोल ठरत असून उलट अशिक्षित अडाणी माणूस बरा वाटत आहे. पुण्य करीता पहले पाप, दुध पाजूनी पोसला साप ही वाटचाल बरी नव्हे अशा शब्दात आजच्या परस्थितीवर परखड मत व्यक्त केले. यावेळी अधिवेशन यशस्वीतेसाठी मार्गदर्शन करणारी जेष्ठ मंडळी, परीश्रम घेतलेले शिक्षक व सेवकांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मल्लिनाथ बिराजदार व भैरवनाथ कानडे यांनी तर आभार शिवाजी सुरवसे यांनी मानले. अधिवेशनाची सांगता साने गुरुजींच्या खरा तो एकची धर्म ही प्रार्थना, वंदेमातरम या गीतांनी झाली. या दोन दिवसीय कार्यक्रमात साने गुरुजी व आलुरे गुरुजी यांच्या जीवन कार्याची उजळणी करून भावी पिढीस प्रेरणा देण्यात आली. चोख नियोजन, उत्तम व्यवस्थापन याचे सर्वच मंडळींनी कौतूक केले.

# साने गुरूजी कथामाला राष्ट्रीय अधिवेशन

## ग्रंथदिंडीने अणदूरमध्ये शिक्षणाचा जागर



संचार वृत्तसेवा

अणदूर, दि. ३० - येथील अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय कार्यकारिणी व शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीमुळे अणदूरमध्ये शैक्षणिक वातावरण निर्माण झाले होते.

शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने कथामाला अधिवेशनात यशवंतराव टेकाळे, श्यामराव कराळे, डी.के. कुलकर्णी, माजीमंत्री मधुकर चव्हाण, पन्नालाल सुराणा, प्राणिमित्र विलासभाई शहा, अशोक म्हमाणे, यशवंतराव पाटणे, अशोक खानापुरे, सुनील पुजारी, मारुतीराव खोबरे, लक्ष्मीकांत पाटील, डी. के. देशमुख, व्ही. जी. पाटील आदींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

संस्थेचे सर्वेसर्वा रामचंद्र आलुरे यांना कथामाला समितीच्यावतीने समाजभूषण हा पुरस्कार सपत्निक देऊन सन्मानित करण्यात आले.

ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव पाटणे यांनी आपल्या मनोगतात गुरूजींचा वसा सुरू ठेवणारे रामचंद्र आलुरे हे खरेच समाजसेवक आहेत. गुरूजी हे फक्त गुरूजी नव्हते तर संस्कारपीठ होते. पुस्तकातून मस्तक सुधारते. साने गुरुजींची 'शामची आई' ही एक संस्कारपीठच आहे. साने गुरूजींचे संस्कार जर विद्यार्थ्यांना मिळाले तर तो जीवनात यशस्वी होतो. लोकशाही बळकटीकरणासाठी हे संस्कार उपयोगी पडतात. विस्कटलेला समाज सुधारण्यासाठी साने गुरुजींचे, सि. ना. आलुरे गुरूजींचे संस्कार महत्त्वाचे वाटतात. शेती, शिक्षण हे याबाबींकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन पाटणे यांनी केले.

# जवाहर महाविद्यालयात जल्लोष युवा शक्तीचा कार्यक्रम

पुण्य नगरी । वृत्तसेवा

**अणदूर:** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मंगळवारी (दि.३१ )जल्लोष युवा शक्तीचा हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कवी विष्णु बापट यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सरपंच रामचंद्र आलुरे उपस्थित होते.या दोन दिवसीय कार्यक्रमात पहिल्या दिवशी विविध लोकगीत,



पोवाडा, समूहगीत, कव्वाली, देशभक्तीपर गीत सादर करण्यात आले. या कार्यक्रमास प्रा.संतोष पवार, राजकुमार स्वामी, प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, विक्रम आलूरे,डॉ.मीना जाधव, डॉ. अनिता मुद्कणा, डॉ. उमाकांत सलगरे, योगेश खराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थिनी शिल्पा राठोड,योगिनी धुमाळ,देवकी मोलगडे, स्नेहा नाटेकर,प्राजक्ता सदाफुले, फौजिया टिनवले, अंकुश मोकाशे, शशांक सोमवंशी,चेतन कस्तुरे इत्यादी विद्यार्थ्यांनी कलाप्रकारांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम. बी.बिराजदार व डॉ. एस.एस.गटलेवार यांनी केले.

पुढारी

# अणदूर येथे साने गुरुजी कथामालेचे ५५ वे राष्ट्रीय अधिवेशन

**अणदूर, पुढारी वृत्तसेवा :** अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला राष्ट्रीय कार्यकारिणी व शिक्षण प्रसारक मंडळ,अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२८) साने गुरुजी कथामालेच्या ५५ व्या राष्ट्रीय अधिवेशनाला अणदूरच्या शिक्षणमहर्षी सि. ना आलूरे गुरुजी विद्यानगरीत सुरुवात झाली. शनिवार व रविवार असे दोन दिवसीय अधिवेशन होणार आहे. अधिवेशनाच्या निमित्ताने अणदूर नगरी सजली आहे.

रविवारी सकाळी अणदूर विद्यानगरीमध्ये भव्य अशी ग्रंथदिंडी काढण्यात आली. विविध राष्ट्रपुरुषांच्या वेशभूषा, ग्रामीण साहित्य,मल्हार मार्तंडाची वेशभूषा, सिध्दरामेश्वर काठी सोहळा,विविध राष्ट्रीय गीते, पंढरपूर विठुरायाची दिंडी,रिंगण सोहळा, आई तुळजाभवानी मातेच्या रूपातील विविध गोंधळी गीते आदींचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी दिंडीमध्ये सादर केली. दोन दिवस विविध वैचारिक व सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी असणार आहे. अधिवेशनाचे उद्घाटन यशवंतराव टेकाळे, राष्ट्रीय अध्यक्ष शामराव कराळे, डी. के. कुलकर्णी, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, ज्येष्ठ समाजसेवक पन्नालाल सुराणा, सरपंच रामचंद्र आलुरे, प्राणीमित्र विलासभाई शहा, अशोक म्हमाणे, यशवंतराव पाटणे, अशोक खानापुरे, मारुती खोबरे गुरुजी,लक्ष्मीकांत पाटील, डी. के. देशमुख, व्ही. जी. पाटील, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सुनील पुजारी, मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.





**अणदूर : सरपंच रामचंद्र आलुरे यांना समाजभूषण पुरस्कार देताना मधुकरराव चव्हाण, शामराव कराळे, पन्नालाल सुराणा आदी मान्यवर. (दुसऱ्या छायाचित्रात) साने गुरुजी कथामालेच्या निमित्ताने शहरातून शोभायात्रा काढण्यात आली.**

**साने गुरुजी कथामाला मुंबई शाखेच्या वतीने अणदूरचे सरपंच तथा शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रमुख, ज्येष्ठ समाजसेवक रामचंद्र आलुरे यांना 'समाजभूषण' हा पुरस्कार सपत्नीक देऊन सन्मानित करण्यात आले. रामचंद्र आलुरे हे शिक्षणमहर्षी आलूरे गुरुजींचा वारसा पुढे घेऊन जात असल्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी बोलताना सांगितले.**

My Latur Edition
Jan 30, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

लोकमत

एकपात्री प्रयोगाने झाली दुसऱ्या दिवसाची सुरुवात

# जीवन गौरव, जिल्हा पुरस्काराने अधिवेशनाचे वाजले सूप

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे आयोजित अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेच्या दोनदिवसीय अधिवेशनाची सांगता साने गुरुजी जीवन गौरव व साने गुरुजी जिल्हा गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरणाने झाली.

२९ जानेवारीला सकाळी सविलताई सपकाळ यांच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' या एकपात्री प्रयोगानी दुसऱ्या दिवसाची सुरुवात झाली, विविध जिल्ह्यांतून आलेल्या विद्यार्थी, मान्यवरांनी कथाकथन सादर करून साने गुरुजी व सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी एम. डी. देशमुख, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार गंगाधर पटणे, स्वागताध्यक्ष रामचंद्र आलुरे, शामराव कराळे, हसन देसाई, अशोक म्हमाणे, सोमनाथ परब, रमेश काळे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, बाबूराव पाटील, पांडुरंग नाडकर्णी, के. व्ही. गाजरे, मनीषा कानडे, अपर्णा निरगुडे, वासंती देशमुख, संजय शिर्के, रणजित ठाकरे, मिहीर नाशीककर, सुनील पुजारी, गजानन कोटेवार, मोहन सावंत, मारुती खोबरे, व्ही. जी. पाटील, प्राचार्य सुरेश ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वागताध्यक्ष रामचंद्र आलुरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एम. बी. बिराजदार व भैरवनाथ कानडे यांनी सूत्रसंचालन केले. लिंबराज सुरवसे यांनी आभार मानले. अधिवेशनासाठी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, चंद्रशेखर कंदले, लिंबराज सुरवसे, गोपाळ कुलकर्णी, मकरंद पाटील, व्ही. डी. पाटील, एस. एस. घंटे, कैलास बोंगरगे, डॉ. एम. बी. बिराजदार, प्रा. डी. एस. कांबळे, सिद्धेश्वर मसुते, शिवशंकर जळकोटे आदींनी पुढाकार घेतला.



**अणदूर येथील अधिवेशनात पुरस्कारांचे वितरण करताना एम.डी. देशमुख, माजी आ. गंगाधर पटणे आदी.**

## दत्तात्रय कुलकर्णी यांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

- यावेळी दत्तात्रय कुलकर्णी यांना साने गुरुजी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर डॉ. मल्लिनाथ बिराजदार, महादेव गपाट, फुलचंद कदम, संगीता शहा (चनशेट्टी), सुभाष सुरवसे, राम जगताप, बसय्या स्वामी, शंकरय्या पवार, आदिनाथ पालखे, संतोष आघाव, सुधाकर हावळे, ज्ञानेश्वर माशाळकर, भीम सुरवसे, आशा मोरजकर, किरण गरड, आण्णा आवारे यांना जिल्हास्तरीय साने गुरुजी गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

Hello Osmanabad
Page No. 4 Jan 30, 2023
Powered by: erelego.com

anna
दिव्य मराठी उस्मानाबाद जिल्हा 23-02-2023

## प्रा.विरभद्रेश्वर स्वामी यांना पीएच.डी पदवी

जळकोट । तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्रा.वीरभद्रेश्वर स्वामी यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. \'ग्रामीण भागातील महिला



ध्ये महिला बचत गटाचे योगदान: एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशष संदर्भ- उस्मानाबाद जिल्हा) या विषयावर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडे संशोधन प्रबंध सादर केला होता. डॉ.चंद्रशेखर पाटील पंडित दीनदयाल महाविद्यालय देवणी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल जवाहर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामचंद्र दादा आलुरे व इतरांनी अभिनंदन केले.

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनि
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
17 Feb 2023 - Page 12



## जवाहर कॉलेजच्या शिक्षकेतरांचा पाठिंब

तभा वृत्तसेवा
अणदूर, दि. १६ फेब्रुवारी - शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या संपाला पाठिंबा म्हणून जवाहर महाविद्यालय येथील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एक दिवसीय लाक्षणिक संप होणार आहे. या प्रमुख मागणीसाठी राज्यातील महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सं चालू आहे. जवाहर महाविद्याल शिक्षकेतर कर्मचारी अधीक्ष कपेर के.जी., हालंगुडे ए.आर चौधरी एस.बी., भुरे पी.आर बसवंतबागडे व्ही.पी., चव्हा डी.आर., काळे एन.पी., सर्जे जं एस., आलुरे एम.बी., काक एम.व्ही. सहभागी आहेत.

लोकमत

## 'जवाहर'मधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संप

लोकमत न्यूज नेटवर्क
**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुरुवारी प्रलंबित मागण्यांसाठी एक दिवसीय लाक्षणिक संप केला. प्रलंबित मागण्या मान्य नाही झाल्यास २० फेब्रुवारीपासून बेमुदत संप करण्याचा इशारा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यावेळी दिला.

मागील चार वर्षांपासून शासन स्तरावर सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना पुनरुज्जीवित करणे, दहा, वीस, तीस लाभाची योजना लागू करणे, सातवा वेतन आयोग फरकाची थकबाकी जमा, रिक्त पदे भरण्यास मान्यता, २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे आदी मागण्यांसाठी राज्यातील महाविद्यालयाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा लाक्षणिक संप सुरू आहे. यात जवाहर महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी अधीक्षक के. जी. कर्पे, ए. आर. हालंगुडे, एस. बी. चौधरी, पी. आर. भुरे, व्ही. पी. बसवंतबागडे, डी. आर. चव्हाण, एन. पी. काळे, जी. एस. सर्जे, एम. बी. आलुरे, एम. व्ही. काकडे आदींनीही सहभाग नोंदविला.

Hello Osmanabad
Page No. 4 Feb 17, 2023
Powered by: erelego.com

पुढारी

# कर्मचाऱ्यांच्या संपाला प्रतिसाद

**अणदुर, पुढारी वृत्तसेवा :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे गुरुवारी (दि.१६) एक दिवशी लाक्षणिक संप त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी करण्यात आला असून एक दिवस काळी फीत लावून संपात कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी संपकऱ्यानी एक दिवसीय लक्षणीक उपोषणामुळे प्रश्न न सुटल्यास २० फेब्रुवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. मागील चार वर्षांपासून शासन स्तरावर प्रलंबित प्रश्न असून यात सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनापुनरुज्जीवित करणे. दहा, वीस, तीस लाभाची योजना लागू करणे. सातवा वेतन आयोग फरकाची थकबाकी जमा करणे.रिक्त पदे भरण्यास मान्यता देणे.सण २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे. या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्यातील महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लाक्षणिक संप चालू आहे. यात जवाहर महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी अधीक्षक करपे के.जी, हालंगुडे ए.आर,चौधरी एस. बी,भुरे पी.आर, बसवंतबागडे व्ही. पी., चव्हाण डी. आर,काळे एन.पी,सर्जे जी. एस, आलुरे एम.बी,काकडे एम. व्ही. या कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.



My Latur Edition
Feb 17, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in



जवाहर महाविद्यालयात सीए अरविंद शंकुर यांनी मार्गदर्शन केले.

## सीए अरविंद शंकुर यांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

प्रतिनिधी | अणदूर

येथील जवाहर महाविद्यालयात 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२३' विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. गुरुवारी (दि.२३) चार्टर्ड अकाउंटंट अरविंद शंकुर यांनी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ते म्हणाले की, जेथे पैसा आहे तेथे कॉमर्सची गरज आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ डिग्री नव्हे तर भावी आयुष्यात स्वतःसह देशाच्या प्रगतीसाठी परिपूर्ण ज्ञान आत्मसात करावे. भारतात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्याचे अर्थसंकल्पावरून दिसून येते. त्यामुळेच शासनाला करवाढ करावी लागते. परिणामी जादा कर भरावा लागत असल्याने बाहेरील अनेक कंपन्या येथे येण्यास धजावत नाहीत. मात्र येथे कर्ज देण्यास तयार असतात. शासनानेच सर्व जबाबदारी उचलली पाहिजे, ही भावना बदलण्याची गरज आहेत. जनतेने प्रामाणिकपणे शासनाचा कर भरला पाहिजे. देशातील फक्त दोन टक्के लोक कर भरतात. त्यामुळे करवाढ करून शासनाला पुढील योजना राबवाव्या लागतात. यापुढे रोखीचे व्यवहार बंद होवून ऑनलाइन होतील. तुमच्या मोबाइलवरून तुम्ही सर्व व्यवहार करू शकता. यातून पारदर्शकता येईल व करबुडवेगिरीला आळा बसेल. विविध उदाहरणांसह कॉमर्स विषय कसा महत्वाचा आहे हे त्यांनी पटवून दिले. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देवून जिद्दीने अभ्यास करा असे आवाहन शंकुर यांनी केले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी डॉ. नंदा भट्टड, वर्षाराणी शंकुर व अणदूर पत्रकार संघाचे अध्यक्ष राजकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्तविक व आभार प्रा. एस. जी. बिराजदार यांनी तर सूत्रसंचालन फौजिया टिनवाले यांनी केले. कार्यक्रमास प्रा. डॉ. मीना जाधव, प्रा. डॉ. सुरेखा भारती, प्रा. डॉ. रुद्रा हिरेमठ, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

7:30 am

लोकमत



महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी गुरुवारी एक दिवसाचा लाक्षणिक संप केला.

Hello Osmanabad
Page No. 4 Feb 17, 2023
Powered by: erelego.com

पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 8
17 Feb 2023

# जिल्ह्यात अनेक ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षकांसह कर्मचारी एक दिवस संपावर

## शासनाच्या उदासीन धोरणाचा महाविद्यालयीन शिक्षकासह कर्मचाऱ्यांकडून केला निषेध, २० फेब्रुवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा शासनाला दिला इशारा







**कळंब** : येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयया युनिट अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या आडमुठ्या आणि उदासीन धोरणाचा निषेधार्थ गुरूवारी (दि.१६) एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्यात आला.

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना रद्द केलेला शासन निर्णय पुनर्जीवित करणे, १०, २०, ३० लाभाची योजना महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करणे, १ जानेवारी २०१६ ते ३१ ऑक्टोबर २०२० अखेर प्रत्यक्ष सातवा वेतन आयोग लागू झाला त्यादरम्यानची फरकाची थकबाकी मिळावी, महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता द्यावी, २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी आदी मागण्यांसाठी हे आंदोलन सुरु आहे. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. नरेंद्रजी काळे, डॉ.संजय कांबळे, प्रकाश गायकवाड, विनोद खरात, नेताजी देशमुख, अरविंद शिंदे, इकबाल शेख, हनुमंत जाधव, संतोष मोरे, बालासाहेब चौधरी, भरत शेळके, उत्तम जाधव, अनिल पवार, यशवंत पाटील, मारुती केचे, दत्तात्रय गावडे, चांगदेव खंदारे, विश्वनाथ वाघमारे, रमेश पवार, बालाजी डीकले, राजाराम जमले, अमोल सुरवसे, अंकुश लोकरे, कर्मचारी संपामध्ये सहभागी झाले होते.

**उस्मानाबाद : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघ व संयुक्त कृती समितीने महाविद्यालयीन शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरु आहे. गुरूवारी (दि.१६) जिल्ह्यात अनेक ठिकाणच्या म हाविद्यालयात शिक्षकांसह कर्मचाऱ्यांनी एक दिवस संप पुकारला होता. मागण्या मान्य न झाल्यास २० फेब्रुवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. जिल्ह्यातील सहभागी महाविद्यालये पुढील प्रमाणे आहेत.

**वाशी : प्रतिनिधी**

वाशी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (दि. १६) विविध मागण्याकरिता काम बंद ठेवून लाक्षणिक संप केला. सध्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे त्यांच्या विविध मागण्यासाठी सर्वत्र आंदोलन चालू आहे. त्याला पाठिंबा म्हणून येथील कर्मचाऱ्यांनी एकदिवसाचा लाक्षणिक संप केला. यावेळी विजय जाधव, मुकुंद कोळी, मोहन डोलारे, शिवाजी साळुंके, विनायक उगलमुगले, अनिल माने, विपुल भालेराव, अजय जाधव, चंद्रकांत घाडगे, प्रवीण बारगजे, स्वप्निल शेळके, सागर ठोंबरे आदींची उपस्थिती होती.

**अणदुर : प्रतिनिधी**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एक दिवशीय लाक्षणिक संप केला. त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी चालू आहे. १५ फेब्रुवारी २०२३ रोजी एक दिवस काळेफित लावून संपाला सुरुवात झाली. लाक्षणिक संप व प्रश्न सुटल्यास २०/०२/२०२३ पासून बेमुदत संप पुकारण्याचे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी निर्णय घेतला आहे. जवाहर महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी अधीक्षक कपेर के. जी., हालंगुडे ए. आर., चौधरी एस. बी., भुरे पी. आर., बसवंतबागडे व्ही. पी., चव्हाण डी. आर, काळे एन.पी., सर्जे जी.एस., आलुरे एम. बी., काकडे एम. व्ही. सहभागी झाले होते.

Image Text

पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 7
04 Feb 2023

## अभिनेत्री सावळे । जवाहर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप

# प्रत्येकाला जीवनात संधी मिळते, तिचे सोनं करा

**अणदूर : प्रतिनिधी**

ज्ञानदान हे श्रेष्ठ दान आहे. प्रत्येकाला जीवनात संधी मिळते. संधीच सोनं करा, संघर्ष करत करत यशाकडे जावे लागते. महाविद्यालयीन जीवनातल्या मित्रामुळे मी घडले. संघर्ष करताना हार मानू नका. प्रत्येक पायरीवर संघर्ष करावा लागतो. घाबरून जाऊन जीवन घडू शकत नाही. कुठल्याही गोष्टीला शॉर्टकट चालत नाही. असे प्रतिपादन सिने अभिनेत्री लागीर झालं जी फेमची मामी विद्या सावळे यांनी केले.अणदूर (ता. तुळजापूर) येथील जवाहर म हाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप झाला. यावेळी प्रमुख पाहुणे सिने अभिनेता राजीव पाटोदकर, सिने अभिनेत्री विद्या सावळे अध्यक्ष, सरपंच रामचंद्र आलुरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सिने अभिनेते राजू पाटोदकर यांनीही अभिनय क्षेत्रातील अनुभव व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना रामचंद्र आलुरे यांनी कलाकारांचे जीवन अजरामर राहते. स्वाभिमान हा विकला जात नाही. अपेक्षा ठेवू नका, अपेक्षाभंग होतात. जे काही पदरात घ्यायचे आहे ते घ्या नवीन कलाकार निर्माण करा, संघर्षानंतरच फळच योग्य असतं कलेचं मोल करता येत नाही. कला शेवटपर्यंत साथ करते, बंदिस्त जीवनातून बाहेर या असे संदेश दिले. या दोन दिवसात काव्यवाचन मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, अंताक्षरी, आनंदनगरी, शेलापागोटे, पारंपारिक



वेशभूषा, विविध गुणदर्शन आदी कार्यक्रम घेण्यात आले होते. अहवाल वाचन व स्वागतपर विचार प्राचार्य उम ाकांत चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी तर आभार डॉ. अनिता मुदकना यांनी मानले.यावेळी डॉ. सोमशंकर राजमाने, डॉ. मीना जाधव, डॉ. अंकुश कदम, डॉ. सहदेव बिराजदार, डॉ. एस. के. कुलकर्णी, प्रा. विवेकानंद वाहुले, डॉ. विश्वास माने, डॉ. माधुरी गडसिंग, डॉ. डी. एस. सुर्यवंशी, डॉ. सुनील रजपूत, डॉ. डी. एन. गटलेवार, डॉ. सत्तेंद्र राऊत, डॉ. आर. व्ही. वरशेट्टी, डॉ. एस. एस. बाड, डॉ. शैलेश शाहिवाले, काशिनाथ करपे दिलीप चव्हाण, संतोष चौधरी, गणेश सर्जे, काकडे महादेव, बसवंत बागडे, नामदेव काळे, शुभांगी स्वामी, अमित आलुरे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# जवाहर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप



अणदुर, दि.०२ (प्रतिनिधी)- येथील जवाहर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा उत्साहात समारोप झाला. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा अणदुरचे सरपंच रामचंद्र आलूरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेते राजीव पाटोदकर, सिने अभिनेत्री विद्या सावळे उपस्थित होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी अनुभव व्यक्त करताना अभिनेत्री विद्या सावळे म्हणाल्या की, ज्ञानदान हे श्रेष्ठ दान आहे. प्रत्येकाला जीवनात संधी मिळते.संधीच सोनं करा.संघर्ष करत करत यशाकडे जावे लागते. महाविद्यालयीन जीवनातले मित्रामुळे घडले. संघर्ष करताना हार मानू नका. प्रत्येक पायरीवर संघर्ष करावा लागतो. घाबरून जाऊन जीवन घडू शकत नाही. कुठल्याही गोष्टीला शॉर्टकट चालत नाही. सिने अभिनेते राजू पाटोदकर यांनीही अभिनय क्षेत्रातील अनुभव व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप करताना रामचंद्र आलुरे म्हणाले की, कलाकारांचे जीवन अजरामर राहते. स्वाभिमान हा विकला जात नाही. अपेक्षा ठेवू नका, अपेक्षाभंग होतात.जे काही पदरात घ्यायचे आहे ते घ्या नवीन कलाकार निर्माण करा, संघर्षानंतरच फळच योग्य असतं कलेचं मोल करता येत नाही. कला शेवटपर्यंत साथ करते, बंदिस्त जीवनातून बाहेर या असे मोलाचे संदेश दिले.

या दोन दिवसात काव्यवाचन मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, अंताक्षरी, आनंदनगरी, शेलापागोटे, पारंपारिक वेशभूषा, विविध गुणदर्शन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अहवाल वाचन व स्वागतपर विचार प्राचार्य चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी तर आभार डॉ. अनिता मुदकना यांनी मानले.

स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी डॉ. सोमशंकर राजमाने , डॉ. मीना जाधव, डॉ अंकुश कदम, डॉ. सहदेव बिराजदार डॉ एस. के. कुलकर्णी, प्रा.विवेकानंद वाहुले, डॉ. विश्वास मने, डॉ. माधुरी गडसिंग, डॉ.डी. एस. सूर्यवंशी, डॉ.सुनील रजपूत, डॉ. डी.एन.गटलेवार,डॉ. सत्तेंद्र राऊत ,डॉ. आर. व्ही. वरशेट्टी, डॉ.एस. एस. बाड, डॉ. शैलेश शाहिवाले, काशिनाथ करपे, दिलीप चव्हाण, संतोष चौधरी, गणेश सर्जे, नामदेव काळे, शुभांगी स्वामी ,यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

---

**दैनिक संघर्ष**

शुक्रवार दि. ०३/०२/२०२३

# जवाहर महाविद्यालयात रंगला शेले पागोटे प्राचार्यासह प्राध्यापकांच्या घेतल्या फिरक्या




**अणदूर दि. २(प्रतिनिधी)** येथील जवाहर महाविद्यालयात दोन दिवस चाललेल्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचा समारोप बुधवार दि.१ रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. दिवसभरातील कार्यक्रमात शेले पागोटे (फिशपॉंड) कार्यक्रमाने रंगत आणली. यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या मित्रासोबत प्राचार्यासह प्राध्यापकांच्या नावे त्यांच्यातील उणीवा,वेशभूषा,थाटमाट व शरीरयष्टीचा आधार घेत फिरक्या घेतल्या तर प्राध्यापकांनीही त्यास दाद देत म्युजिक फिशपॉंडमधे गाण्यावर ताल धरला.अत्यंत उत्साहात व जल्लोषात टाळ्या व वन्समोअर घेत तरुणाईने जल्लोष केला.

बुधवारी सकाळी आनंद नगरी व पारंपरिक वेशभूषेनंतर अंताक्षरी स्पर्धा घेण्यात आल्या. शेला पागोटे पार पडल्यानंतर विविध स्पर्धेतील तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना सिने अभिनेते तथा उपसंचालक माहिती व जनसंपर्क विभाग,पुणे राजीव पाटोदकर व सिने अभिनेत्री तथा लागीर झालं जी फेम विद्या सावळे या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी पाटोदकर व सावळे यांनी चित्रपट सृष्टीतील अनुभव कथन करून ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार व कल्पक असून त्यांनी पुढे यावे असे आवाहन केले.

अहवाल वाचन व स्वागतपर विचार प्राचार्य चनशेट्टी यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे हे होते. तर माजी मुख्याध्यापक मारुती खोबरे, व्यंकट पाटील व मुख्याध्यापक सुरेश ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, प्रा.उमाकांत सलगर,प्रा. सुर्यकांत आगलावे,प्रा.अनिता मुदकण्णा,प्रा.मल्लिनाथ बिराजदार, प्रा.मीना जाधव,प्रा.राजशेखर नळगे, प्रा.सत्येंद्र राऊत,प्रा.बाड, प्रा.माधुरी गडसिंग, प्रा.अंकुश कदम,प्रा.विवेकानंद वाहुळे आदिनी पुढाकार घेतला तर काशीनाथ कर्पे,संतोष चौधरी, दिलीप चव्हाण,गणेश सर्जे,महादेव काकडे,बसवंत बागडे,नामदेव काळे,शुभांगी स्वामी व अमित आलुरे यांनी उत्तम व्यवस्थेसाठी परिश्रम घेतले.

# जवाहरमध्ये 'कुटुंब रंगले काव्यात'



संचार वृत्तसेवा

अणदूर, दि. २- जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. संमेलनाचे उद्घाटन कुटुंब रंगले काव्यात कार्यक्रमाचे सादरकर्ते विसुभाऊ बापट यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा सरपंच रामचंद्र आलुरे हे होते. यावेळी मारुती खोबरे गुरुजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व दीपप्रज्वलित करून वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले.

स्नेहसंमेलन कार्यक्रमात महाविद्यालयीन तसेच विद्यालयातील शालेय विद्यार्थ्यांनी विविध मराठी, हिंदी गाणे, लोकगीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले व आभार डॉ. अनिता मुदकन्ना यांनी मानले.

---

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
epaper.dainiktarunbharat.com
28 Feb 2023 - Page 12



## निबंध स्पर्धेत आदर्श महाविद्यालयाचे यश

**अणदूर दि. २७ फेब्रुवारी-**

अणदूर येथील हॅलो मेडिकल फाउंडेशन व दुर्गादेवी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे कै. विठ्ठल पुंडलिक रेंगे स्मृती निबंध स्पर्धेत, आदर्श कनिष्ठ महाविद्यालयातील कु.शेख सानिया, शांभवी देशपांडे व मांडजे साहिल, अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय आले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य सोमशंकर महाजन, उपप्राचार्या संध्या सगर व मार्गदर्शक प्रा.माळगे राम यांनी अभिनंदन केले. बक्षिस वितरणाचा कार्यक्रम ग्रामीण विज्ञान केंद्र अणदूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

---

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
epaper.dainiktarunbharat.com
28 Feb 2023 - Page 12



## जवाहर महाविद्यालयात मराठी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**अणदूर, दि. २७ फेब्रुवारी-**

जवाहर महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे, प्रसिद्ध साहित्यिक शशिकांत जोशी व प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा.डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले तर परिचय आणि आभार प्रा. डॉ. राजशेखर नळगे यांनी केले. कार्यक्रमास डॉ. एम. बी. बिराजदार, डॉ. मुदकांना डॉ. आगलावे प्रा. वाहुले प्रा. कांबळे, प्रा. कलशेट्टी उपस्थित होते.

हिंदवी बाण्याचे मराठी दैनिक

# शिव निर्णय

DAILY SHIV NIRNAY

RNI No.-MAHMAR/2020/79125

रायगड , पुणे, सातारा, सोलापूर येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## जवाहर महाविद्यालय मध्ये मराठी राजभाषा दिन साजरा

**शिव निर्णय/** इटकळ : जवाहर महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिन सोमवार दि.२७ रोजी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, प्रसिद्ध साहित्यिक शशिकांत जोशी व प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना, शशिकांत जोशी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वाचन केले पाहिजे, समाज निरीक्षण करून कथा कविता लिहिल्या पाहिजेत. छंद जोपासला पाहिजे. वाचन संस्कृती जोपासली मराठीमध्ये संत पंत संत कवी हे मराठी भाषेचे वैभव आहे.. कवी केशवसुतानी 'एक तुतारी दे मजा आणून' यासारख्या कवितेतून कवितेचा, समाजाचा नवीन जीवनानुभव सांगितला. मराठी भाषेचे कौतुक केले. आज प्रत्येकाला इंग्रजी भाषेचे कौतुक वाटत आहे. त्यामुळे प्रत्येक जण मराठीत बोलण्याऐवजी इंग्रजीमध्ये, हिंदीमध्ये बोलण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु आपण आपल्या मातृभाषेमधून आशय अभिव्यक्त करू शकतो तो इतर भाषेमधून करू शकत नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी मराठी भाषेमध्ये बोलणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय आणि आभार प्रा. डॉ. राजशेखर नळगे यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. एम. बी. बिराजदार, डॉ. मुदकांना मॅडम डॉ. आगलावे प्रा. वा-हुले प्रा. मॅडम प्रा. कलशेट्टी मॅडम सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**दिनेश सलगरे प्रतिनिधी इटकळ**

---

## इंग्रजी ही ज्ञानाची तर मराठी ही जगण्याची भाषा : प्रा. संजय कुलकर्णी



सोलापूर भूषण

सोलापूर, (प्रतिनिधी) कुसुमाग्रज म्हणजे मराठी भाषेला समृद्ध करणारे सर्वश्रेष्ठ असे लेखक आहेत. मराठी आपली मातृभाषा म्हणजे मायेची भाषा आहे त्याचा अभिमान आपण बाळगला पाहिजे व मराठी भाषेचे संवर्धन केले पाहिजे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. संजय कुलकर्णी यांनी मराठी राजभाषा दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत असताना व्यक्त केले.

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज, बोरामणी येथे मराठी राजभाषा दिनाच्या आयोजित कार्यक्रमा प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी प्रा. संजय कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व सांगताना मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या हृदयाची भाषा आहे असे सांगितले.

प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले निवृत्त पोलीस उपनिरीक्षक व साहित्यिक मा. शशिकांत जोशी यांनी विद्यार्थ्यांना मराठी साहित्याचे वाचन केले पाहिजे, परके लोक महाराष्ट्रात येऊन मराठी भाषा अवगत करून मराठी भाषेतील साहित्याच्या अभ्यासाचा प्रबंध तयार करून पी. एचडी. पदवी संपादन करतात, अशी आपली मराठी भाषा जिच्या कडे ज्ञानाचा अखंड साठा आहे त्याचा वापर आपण नक्कीच केला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी मराठी राज्यभाषा दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी बोलताना केले.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मा. प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी मराठी राजभाषा दिन हा दिवस महाराष्ट्रासाठी पर्वणीचा दिवस आहे, असे प्रतिपादन केले तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे असेही विद्यार्थ्यांना आवाहन केले.

या कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर ग्लोबल व्हीलेजच्या प्राचार्या आसमा नदाफ , संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी , प्रा. ॲड. अनिल जाधव यांच्यासह सर्व शिक्षक, प्राध्यापक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. आकांक्षा विभुते हिने केले तर आभार मराठी विभागाच्या प्रा. सविता शेरीकर यांनी मानले.

जनमत
सर्वसामान्यांचे

## जवाहर महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिन साजरा

इटकळ, दि.२७ (प्रतिनिधी):- जवाहर महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिन सोमवार दि.२७ फब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, प्रसिद्ध साहित्यिक शशिकांत जोशी व प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना, शशिकांत जोशी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वाचन केले पाहिजे, समाज निरीक्षण करून कथा कविता लिहिल्या पाहिजेत. छंद जोपासला पाहिजे. वाचन संस्कृती जोपासली पाहिजे. मराठीमध्ये संत पंत संत कवी हे मराठी भाषेचे वैभव आहे.. कवी केशवसुतानी'एक तुतारी दे मजा आणून' यासारख्या कवितेतून कवितेचा, समाजाचा नवीन जीवनानुभव सांगितला. मराठी भाषेचे कौतुक केले. आज प्रत्येकाला इंग्रजी भाषेचे कौतुक वाटत आहे. त्यामुळे प्रत्येक जण मराठीत बोलण्याऐवजी इंग्रजीमध्ये, हिंदीमध्ये बोलण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु आपण आपल्या मातृभाषेमधून जो आशय अभिव्यक्त करू शकतो तो इतर भाषेमधून करू शकत नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी मराठी भाषेमध्ये बोलणे आवश्यक आहे. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य उमाकांत चनशेट्टी



यांनी विद्यार्थ्यांना कथा कविता, कादंबरी, ललित लेखन याचे वाचन करा त्यामुळे तुमचे व्यक्तिमत्व समृद्ध होईल असे म्हणाले. नाववंत लेखकाचे साहित्य वाचून त्यातील अनुभव आत्मसात करा. स्वतः स्वतःचे मूल्यमापन करा. त्यामुळे तुमचे व्यक्तिमत्व इतरावर प्रभाव पाडेल. वाचते व्हा, लिहिते व्हा असा संदेश त्यांनी दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. संजय कुलकर्णी यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय आणि आभार प्रा. डॉ. राजशेखर नळगे यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. एम. बी. बिराजदार, डॉ. मुदकांना मॅडम डॉ. आगलावे प्रा. वाहुले प्रा. कांबळे मॅडम प्रा. कलशेट्टी मॅडम सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**दिनेश सलगरे प्रतिनिधी इटकळ**

दै.संघर्ष ६

## जवाहर महाविद्यालयात केंद्रीय अर्थसंकल्प २०२३ चर्चासत्र

**अणदूर दि. २३ (प्रतिनिधी)** येथील जवाहर महाविद्यालयात चला जाणून घेऊ केंद्रीय अर्थसंकल्प २०२३ या विषयावर चर्चासत्र संपन्न झाले येथील कॉमर्स विभागाच्या विद्यार्थ्यांना गुरुवार दि.२३ रोजी सोलापूर येथील चार्टर्ड अकाऊटंट अरविंद शंकुर यांनी केंद्राचे बजेट व अर्थसंकल्प या विषयावर पैसा कसा येतो व कसा जातो याबाबत मार्गदर्शन केले. जिथे पैसा तिथे कॉमर्स आहे तेंव्हा विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास बाळगून जिद्दीने परिपूर्ण ज्ञान आत्मसात करावे असे सांगून देशात फक्त दोन टक्के लोक कर भारतात त्यामुळे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्याने करवाढ होते असे स्पष्ट केले. आपल्या देशात जादा कर भरावा लागत असल्याने बाहेरील अनेक कंपन्या येथे येण्यास धजावत नाहीत मात्र येथे कर्ज देण्यास तयार असतात.शासनानेच सर्व कांही केले पाहीजे ही भावना बदलून जनतेने प्रामाणिकपणे शासनाचा कर भरला पाहिजे. येत्या काळात व्यवहार रोखीने बंद होवून ऑनलाइन होतील त्यामुळे करबुडवेगिरीला आळा बसेल असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना नवनवीन क्षेत्रात पुढे येण्यासाठी कॉमर्स विषय फायदेशीर असल्याचेही विविध उदाहरणासह पटवून दिले. यावेळी शंकुर यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी दिशा इन्स्टिटयूट सोलापूरचे संचालक नंदा भट्टड, वर्षाराणी शंकुर व अणदूर शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष राजकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभार प्रा.एस.जी.बिराजदार यांनी तर सूत्रसंचालन फौजीया टिनवाले यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

सकाळ

## जवाहर महाविद्यालयात महिलांसाठी शिबिर उत्साहात

**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयात महिलांना अन्नप्रक्रिया टिकणारे अन्नपदार्थ बनविण्याचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगती महिला मंडळाच्या अध्यक्ष संजीवनी आलुरे होत्या. तर प्रमुख अतिथी डॉ. किशोरी शहा, बालभारतीच्या सदस्य शिवकन्या कदेर यांची उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. शहा यांनी तंत्रज्ञानाचा वापर करुन चॉकलेट ,केक कसे बनवावे याबद्दलची माहिती दिली. विविध प्रकारचे चॉकलेट्स, गव्हाच्या पिठापासून बिस्किट,बिस्कीटापासून केक, व सॉस बनविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. महिलांना आरोग्य संपन्न राहण्यासाठी आहारात कोणते पदार्थ असावेत याची माहिती दिली. शिवकन्या कदेर यांनी महिला सक्षमीकरण, आरोग्य याविषयीची माहिती दिली. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय समन्वयक डॉ. माधुरी गडसिंग यांनी केले. सूत्रसंचालन शिल्पा राठोड व आभार डॉ.सुरेखा भारती यांनी मानले. यावेळी गावातील महिला विद्यार्थी ,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Aurangabad, OsmanabadToday
22/03/2023 Page No. 4

लोकमत

## फूड प्रोसेसिंगबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयात फूड प्रोसेसिंग व प्रिझर्वेशन यावर आधारित एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रगती महिला मंडळाच्या अध्यक्षा संजीवनी आलुरे तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. किशोरी शहा, बालभारतीच्या सदस्य शिवकन्या कदेर उपस्थित होत्या. यावेळी डॉ. किशोरी शहा यांनी चॉकलेट्स, केक कसे बनवावे याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. महिलांचा योग्य आहार, गर्भधारणेमध्ये घ्यावयाचा आहार याबाबतही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. माधुरी गडसिंग, सूत्रसंचालन शिल्पा राठोड यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. सुरेखा भारती यांनी मानले.

Hello Dharashiv
Page No. 4 Mar 22, 2023
Powered by: erelego.com

सोलापूर
तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
20 Mar 2023 - Page 10

### संक्षिप्त वृत्त...



## जवाहर महाविद्यालयात कार्यशाळा यशस्वी

**अणदूर, दि.१९ मार्च-**

येथील जवाहर महाविद्यालयात एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक डॉक्टर महादेव कोकाटे हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष अणदूरचे सरपंच रामचंद्र आलूरे, उपप्राचार्य डॉक्टर मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉक्टर कोकाटे म्हणाले की, विद्यार्थी आणि शिक्षकांची भूमिका बदलणार आहे. हे शिक्षण विद्यार्थी केंद्रित होणार आहे.बदल मान्य करावा लागणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण उत्साहाने आपण स्वीकारू या. अध्यक्षीय समारोप रामचंद्र आलूरे यांनी केला प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे यांनी केले.पाहुण्यांचा परिचय डॉ.अंकुश कदम यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ.मल्लिनाथ बिराजदार व आभार डॉ.राजशेखर नळगे यांनी केले.

पुढारी

## देशबांधणीच्या कार्यात सर्वसामान्य स्त्रीचे योगदान महत्त्वपूर्ण

### न्यायमूर्ती मृदुला भटकर : जवाहर महाविद्यालयात एकदिवसीय चर्चासत्र

**अणदूर, पुढारी वृत्तसेवा:** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'आधुनिक भारतीय समाजात महिलांचे योगदान' या विषयावर शनिवारी (दि.११) एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती माननीय मृदूला भटकर ह्या होत्या तर यावेळी अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामचंद्र आलुरे ड नागनाथराव कानडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ मल्लिनाथ लंगडे,प्राचार्य सुरेश



ठोंबरे,समाजशास्त्र विभागप्रमुख वीरभद्रेश्वर स्वामी,संयोजिका डॉ.मीना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना भाटकर म्हणाल्या की,देश बांधणीच्या कार्यात सर्वसामान्य महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. निसर्गतःच महिलेला शक्ती मिळालेला आहे.कुठल्याही गोष्टीची अडथळा न समजता कार्य करीत राहिल्यास स्त्री निश्चितच कर्तृत्वाचे उंच शिखर गाठू शकते. डेकोरेटिव्ह म्हणजे महिला दिन नाही महिलांचे योग्य सक्षमीकरण होणे गरजेचे आहे.भारतीय घटना खूप पुरोगामी आहे भारतीय घटनेत महिलेला महत्त्वपूर्ण स्थान दिलेला आहे.प्रत्येक माणूस स्वतंत्र आहे. प्रत्येक गोष्टीसाठी एक योग्य वेळ असते ,सोबत निसर्ग असतो, त्याचा भान ठेवा. संसार करताना प्रगती थांबतो असे विचार चुकूनही मनात आणू नका, जबाबदारी स्वीकारून प्रत्येक क्षेत्रात यशस्वी भरारी घ्या.आदिवासी भागात उल्लेखनीय कार्य केलेल्या द्रौपदी मुरमु आज राष्ट्रपती पदावर विराजमान आहेत प्रतिभाताई पाटील,हिंदी साहित्यिका महादेवी वर्मा अरुंधती राय यासारख्या महिलांनी महत्वपूर्ण योगदान दिलेला आहे. नाट्य, कला, विज्ञान ,शिक्षण प्रत्येक क्षेत्र आज स्त्री पदाक्रांत करीत आहे. स्त्रीच्या कर्तृत्वाला निश्चितच या समाजामध्ये खूप मोठ् स्थान आहे. म्हणून देशाच्या प्रगतीत स्त्रियांनी योगदान द्यावे असे आवाहन केले.या कार्यक्रमात सौ वैशाली घुगे यांना शांताई प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.चर्चासत्राचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार व फौजीया टीनवाले तर आभार डॉ.वीरभद्रेश्वर स्वामी यांनी मानले.या चर्चासत्रास महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी प्राध्यापक बंधू-भगिनी व परिसरातील प्राध्यापक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

My Latur Edition
Mar 13, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 7
15 Mar 2023

# व्यवस्थापन परिषदेवर डॉ. कदम विजयी झाल्याबद्दल सत्कार

**अणदूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सर्व सिनेट मेंबर मधून निवडून दिल्या जाणाऱ्या विद्यापीठाच्या सर्वोच्च सभागृह असणाऱ्या व्यवस्थापन परिषद निवडणुकीत अणदुर येथील जवाहर महाविद्यालयाचे डॉ. अंकुश कदम यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. त्याबद्दल त्यांचा माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, अणदूरचे सरपंच रामचंद्र आलूरे, जिल्हा परिषद सदस्य बाबुराव चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



या निवडणुकीसाठी राज्यपाल विद्यापीठ कुलगुरू, विधानसभा अध्यक्ष नियुक्त आमदार, विधान परिषद सभापती नियुक्त आमदार सर्व निवडून आलेले सिनेट मेंबर राज्यपाल नियुक्त सिनेट मेंबर व विद्यापीठ अधिकारी वर्गाचे मतदान होते. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या हक्काचे ३० मतदान होते. निवडून येण्यासाठी मतांची जुळवाजुळव करणे गरजेचे होते. त्यामुळे अंकुश कदम यांना ही निवडणूक अवघड जाईल, अशी चर्चा होती. परंतु राजकीय कौशल्याच्या जोरावर कदम यांनी हा विजय भाजपच्या हातातून खेचून आणल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. भालचंद्र बिराजदार, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, विक्रम आलुरे, योगेश खराडे, उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे, महाविद्यालयाचे प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत

### जवाहर महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

# देशबांधणीच्या कार्यात सर्वसामान्य स्त्रीयांचे योगदान महत्त्वपूर्ण : भटकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** कुठल्याही गोष्टीची अडथळा न जुमानता कार्य करीत राहिल्यास स्त्री निश्चितच कर्तृत्वाचे उंच शिखर गाठू शकते. डेकोरेटिव्ह म्हणजे महिला दिन नाही. महिलांचे योग्य सक्षमीकरण होणे गरजेचे आहे, असे सांगून देशबांधणीच्या कार्यात सर्वसामान्य स्त्रीचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती मृदूला भटकर यांनी केले.

येथील जवाहर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'आधुनिक भारतीय समाजात महिलांचे योगदान' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामचंद्र आलुरे तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. नागनाथराव कानडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, प्राचार्य सुरेश ठोंबरे, समाजशास्त्र विभागप्रमुख वीरभद्रेश्वर स्वामी, संयोजिका डॉ. मीना जाधव यांची उपस्थिती होती.




अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी माजी न्यायमूर्ती मृदुला भटकर व मान्यवर.

## संसार केल्याने प्रगती थांबत नाही

■ भारतीय घटना खूप पुरोगामी असून, भारतीय घटनेत महिलांना महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे सांगून माजी न्यायमूर्ती मृदूला भटकर म्हणाल्या, संसार करताना प्रगती थांबते, असे विचार चुकूनही मनात आणू नका. जबाबदारी स्वीकारून प्रत्येक क्षेत्रात यशस्वी भरारी घ्या. आदिवासी भागात उल्लेखनीय कार्य केलेल्या द्रौपदी मुर्मू आज राष्ट्रपती पदावर विराजमान आहेत. प्रतिभाताई पाटील, हिंदी साहित्यिका महादेवी वर्मा, अरुंधती राय यांसारख्या महिलांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. नाट्य, कला, विज्ञान, शिक्षण प्रत्येक क्षेत्र आज स्त्री पादाक्रांत करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात वैशाली घुगे यांना शांताई प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चर्चासत्राचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार, फौजिया टीनवाले यांनी केले. आभार डॉ. वीरभद्रेश्वर स्वामी मानले. या चर्चासत्रास महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व परिसरातील महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

Hello Dharashiv
Page No. 4 Mar 13, 2023
Powered by: erelego.com

सोलापूर

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित

epaper.dainiktarunbharat.com
12 Mar 2023 - Page 5




# देश बांधणीच्या कार्यात सर्वसामान्य स्त्रीचे योगदान महत्त्वपूर्ण: न्यायाधीश मृदुला भाटकर

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ११ मार्च-**

देश बांधणीच्या कार्यात सर्वसामान्य स्त्रीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांनी केले.

जवाहर कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालय अणदुर येथे समाजशास्त्र विभागाच्या वतीने आधुनिक भारतीय समाजात महिलांचे योगदान या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अणदूरचे सरपंच रामचंद्र आलूरे हे होते तर व्यासपीठावर ॲड. नागनाथ कानडे, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, प्राचार्य सुरेश ठोंबरे, उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, डॉ. मीना जाधव, डॉ. विरभद्रेश्वर स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात वैशाली घुगे यांना शांताई प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार, फौजीया टीन वाले व आभार डॉ. वीरभद्रेश्वर स्वामी यांनी मानले. या चर्चासत्रास प्रा. कांबळे, कांबळे, महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी प्राध्यापक बंधू-भगिनी व परिसरातील प्राध्यापक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी माध्यम व मातृभाषेतून शिक्षण विद्यार्थ्यांना खूप फायदेशीर: माजी न्ययमूर्ती मृदूला भाटकर

**अणदूर प्रतिनिधी: प्रविण गुरव**



माजी न्यायमूर्ती मा.मृदूला भाटकर यांची जवाहर विद्यालयास सदिच्छा भेट

*अणदूर दि.12 - जवाहर विद्यालय, अणदूर येथे आज माजी न्यायमूर्ती मा.मृदूला भाटकर यांनी विद्यालयास सदिच्छा भेट दिली... त्याप्रसंगी सकाळी जवाहर महाविद्यालयातील ' आधुनिक भारतीय समाजात महिलांचे योगदान ' एक दिवसीय चर्चासत्रासाठी त्या आल्या होत्या. अणदूर येथील ग्रामदैवत खंडोबा दर्शन झाल्यानंतर जवाहर विद्यालय, अणदूर येथे त्यांचा शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर चे विद्यमान सचिव तथा शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आदरणीय मा.श्री.रामचंद्र दादा आलुरे यांनी माजी न्यायमूर्ती मा.मृदूला भाटकर, जेष्ठ विधीतज्ञ मा.श्री.नागनाथराव कानडे यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला.. यावेळी माजी न्यायमूर्ती भाटकर यांनी शिक्षण प्रक्रिया बदलत आहे त्याप्रमाणे *शिक्षण घ्या, नवनवीन ज्ञान घ्या, भरपूर अभ्यास करा, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही,असे अनमोल मार्गदर्शन केले.यावेळी त्यांचे शालेय जीवन आठवले असे ते म्हणाले, तुम्ही किती सुंदर मुले आहात,असेच नियमित शाळेत या,अभ्यासाकडे विशेष लक्ष केंद्रित करा असा मोलाचा संदेश दिला..* माजी न्यायमूर्ती मा.मृदूला भाटकर यांचे स्वागत शालेय परिपाठातील " या भारतात बंन्धु भाव नित्य असु दे " या गीताने केले..या विद्यार्थ्यांच्या गीताबद्दल त्यांनी विद्यार्थी,शिक्षक यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले..आणि विद्यार्थ्यांनां मोठ्या मनाने पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.. यावेळी नळदुर्ग पोलीस स्टेशन पोलीस अधिकारी,ग्रा.प.सदस्य श्री.बालाजी घुगे,जवाहर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ.श्रीमती अनिता मुदकण्णा , मुख्याध्यापक श्री.सुरेश ठोंबरे उपमुख्याध्यापक श्री.गोपाळ कुलकर्णी ,सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक श्री.रोहित मोरे यांनी तर आभार श्री.मकरंद पाटील यांनी केले..!*



# जवाहर महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे समारोप




**शिवनिर्णय**/ अणदूर : जवाहर महाविद्यालय अणदुर येथे इतिहास विभाग व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,औरंगाबाद विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी राम नंद तीर्थ व्याख्यानमाले चे समारोप संपन्न झाले. या व्याख्यानमाले-चे प्रमुख वक्ते डॉ. शिरीष व मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्वामी रामानंद तीर्थ व स्वातंत्र्य सेनानी वीरभद्रया स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलित करून करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य , डॉ.उम ाकांत चनशेट्टी ,प्रमुख उपस्थिती मा. रामचंद्र दादा आलुरे ,मारुती खोबरे गुरुजी, डॉक्टर अशोक चिं-चोले , प्रा.सुभाष स्वामी, श्रीमंत मुळे गुरुजी, उपप्राचार्य डॉ. लंगडे डॉ सुनील राजपूत फुलचंद दूधभाते यांची प्रमुख उपस्थिती होती

संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ या विषयावर समारोपाचे पुष्प गुंपताना डॉ. खेडगीकर म्हणाले की, लोककल्याण स्वामीजींचा मुख्य उद्देश होता. मातृभाषेतून शिक्षण देऊन देशप्रेम निर्माण करण्याचे कार्य निजाम राजवटीत स्वामी करीत राहिले. त्यांनी आपल्या जीवनात बारा वर्षाची तपश्चर्या केली वाटत असे की हा कृश संन्याशी काय मार्गदर्शन करणार आहे असे वाटत असतानाच स्वामीजी आपल्या वाणीने सभा भारून टाकत असे त्यांचे म्हणणे असे होते की हा भावनिक, भाषिक प्रश्न नसून विकासाचा प्रश्न आहे .यासाठी संयुक्त महाराष्ट्राची आवश्यकता आहे. असे विचार व्यक्त केले याप्रसंगी विचार व्यक्त करताना रामचंद्र दादा आलूरे की ,अशा प्रकारच्या व्याख्यानमालेतून विद्यार्थ्यांनी विचाराची मशाल पेटवली पाहिजे,त्यांच्याकडून प्रेरणा घेतली पाहिजे, देशासाठी बलिदान दिलेल्यांचे आठवण ठेवली पाहिजे अशा प्रकारचे विचार व्यक्त केले .अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉक्टर उमाकांत चनशेट्टी यांनी केली. प्रास्ताविक डॉ.सुनील रजपूत यांनी केले सूत्रसंचालन डॉ मल्लिनाथ बिराजदार पाहुण्यांचा परिचय आकांक्षा मोकाशे व शेवटी आभार प्रा. वाहुळे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी शिक्षिकेत र कर्मचारी व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# अणदूर येथे भारतीय समाजात महिलांचे योगदान ग्रंथाचे प्रकाशन

**पुण्य नगरी** । वृत्तसेवा




**अणदूर :** तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित चर्चासत्र कार्यक्रमात आधुनिक भारतीय समाजात महिलांचे योगदान या विषयावरील संशोधनपर ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

जवाहर महाविद्यालयात आधुनिक भारतीय समाजात महिलांचे योगदान या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र घेण्यात आले. या चर्चासत्रात पहिल्या सत्रामध्ये डॉ. शुभांगी उंबरकर, शास्त्रज्ञ एनसीएल पुणे यांनी विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतीय महिलांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी विज्ञान क्षेत्रामध्ये आजच्या महिलां उत्तम प्रकारे कार्य करत आहेत असे प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी माधवराव पाटील महाविद्यालयाच्या डॉ. शीला स्वामी या होत्या. दुसऱ्या सत्रामध्ये शोभा कुलकर्णी, जिल्हा समन्वयक महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी स्वयंसहाय्यता गटातून ग्रामीण महिलांचे राष्ट्र उभारणीतील योगदान या विषयावर मार्गदर्शन केले.या चर्चासत्रामध्ये डॉ. अनिल गाडेकर कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालय माकणी, डॉ. शीला स्वामी, माधवराव पाटील महाविद्यालय मुरूम, डॉ. अनिता मुदकण्णा, डॉ. सुरेखा भारती , डॉ. ज्योती हत्तरगे,जवाहर कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालय अणदूर यांनी पेपर वाचन केले. या चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी किरण देशमाने यांनी मनोगत व्यक्त केले. , अध्यक्षस्थानी डॉ. मनीषा असोरे होत्या. यावेळी प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी,डॉ.मल्लिनाथ बिराजदार, डॉ. वीरभद्रेश्वर स्वामी, डॉ.मीना जाधव, एम.एम.कांबळे,आर.बी.कांबळे महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक ,ग्रामस्थ उपस्थित होते.

# अणदूर येथे व्याख्यानमालेचा समारोप



**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**अणदूरः** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचा समोरोपीय कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास डॉ. शिरीष खेडगीकर, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, रामचंद्र आलुरे, मारुती खोबरे, डॉ.अशोक चिंचोले, प्रा. सुभाष स्वामी, श्रीमंत मुळे, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. सुनिल राजपूत, फुलचंद दूधभाते यांची प्रमुख उपस्थिती होती. संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ या विषयावर समारोपाचे पुष्प गुंपताना डॉ. खेडगीकर म्हणाले की, लोककल्याण हा स्वामीजींचा मुख्य उद्देश होता. मातृभाषेतून शिक्षण देऊन देशप्रेम निर्माण करण्याचे कार्य निजाम राजवटीत स्वामी करीत राहिले. संयुक्त महाराष्ट्राचा लढा त्यांनी उभारला.अध्यक्षीय समारोप प्राचार्य चनशेट्टी यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रजपूत, सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार, पाहुण्यांचा परिचय आकांक्षा मोकाशे व शेवटी आभार प्रा. विवेकानंद वाहुळे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 7
11 Mar 2023

**प्रा. अमृत महाजन यांचे प्रतिपादन** । स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन व कार्य या विषयावर व्याख्यान

# स्वातंत्र्य, समता, बंधुता नांदली पाहिजे म्हणून स्वामी रामानंद धडपडत राहिले

**अणदूर : प्रतिनिधी**

जवाहर महाविद्यालयातील इतिहास विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालाचे आयोजन करण्यात आल.

या व्याख्यानमालेचे उद्घाटन अंबाजोगाई येथील योगेश्वरी नूतन विद्यालयाचे प्रमुख वक्ते प्रा. अमृत महाजन यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलित करून करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. रामचंद्रदादा आलुरे, मारुती खोबरे गुरुजी, डॉ. अशोक चिंचोले, प्रा. सुभाष स्वामी, श्रीमंत मुळे गुरुजी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन व कार्य या विषयावर पहिले पुष्प गुंपताना अमृत महाजन म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ म्हणजे हातात काठी, भगवी दोन कफणी, हडकुळ शरीर, एवढ्याच तुटपुंज्या साधनावर बलाढ्य अशा निजामाशी त्यांनी लढा दिला. स्वातंत्र्य, समता, बंधुता नांदली पाहिजे म्हणून स्वामीजी धडपडत राहिले. अनेकांची जाच सहन करत इंग्रज, वतनदार, जमीनदार यांच्याशी संघर्ष करत राहिले. स्वामीजी बहुभाषा ज्ञानी होते. स्वामीजी विज्ञानवादी होते. तेलगु, कन्नडा, उर्दु, मराठी,




हिंदी, इंग्रजी इत्यादी भाषेवर स्वामीजींचे प्रभुत्व होतं. निजामाच्या काळात सर्व प्रकारच्या संघटनांवर बंदी होती. मराठवाडा मुक्ती संग्राम एक असंतोषाचा इतिहास आहे. संघर्षमय प्रवास आहे. स्वामीजींचा जीवन एक संघर्षमय प्रवास होता. माझे संपूर्ण जीवन देश सेवेसाठी घालीन, अशी प्रार्थना त्यांनी केली. महापुरुषाला महात्मा, महापुरुष का म्हटले जाते. लोकांचे नेतृत्व करायचं असेल तर लोकांना समजून घेतलं पाहिजे. हातात शस्त्र न घेता एक संन्याशी लढत राहिला. तरुणांच्या पाठीशी उभा राहिला. महापुरुषांच्या जीवनात आयुष्याच्या प्रेरणा दडल्या आहेत. आयुष्याची दिशा निश्चित करायचं असेल तर महापुरुषांना समजून घेऊ या. असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केला. प्रास्ताविक डॉ. सुनील रजपूत यांनी केले. सूत्रसंचालन फौजीया टीनवाले यांनी, पाहुण्यांचा परिचय पल्लवी मनशेट्टी व आभार डॉ. फुलचंद दूधभाते यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामींनी संयुक्त महाराष्ट्राची गरज पटवून दिली होती

**डॉ. खेडगीकर यांचे मत**

**प्रतिनिधी** | अणदूर

येथील जवाहर महाविद्यालयातील इतिहास विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेचा समारोप वक्ते डॉ. शिरीष खेडगीकर यांच्या 'संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ' या विषयावर तिसरे पुष्प गुंफून करण्यात आला. या कार्यक्रमाचा प्रारंभ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्वामी रामानंद तीर्थ व स्वातंत्र्य सेनानी वीरभद्रया स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व




' संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ' वर डॉ. खेडगीकरांनी मार्गदर्शन केले.

दीप प्रज्वलनाने झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. डॉ. खेडगीकर म्हणाले की, स्वामींनी निजाम राजवटीत मातृभाषेतून शिक्षण देऊन देशप्रेम निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांनी आपल्या जीवनात १२ वर्षांची तपश्चर्या केली. मराठवाडा मुक्तिसंग्राम हा भावनिक, भाषिक प्रश्न नसून विकासाचा प्रश्न आहे. लोककल्याण हा स्वामीजींचा मुख्य उद्देश होता, यासाठी संयुक्त महाराष्ट्राची आवश्यकता असल्याचे पटवून दिले होते. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी राजकारणातील अनेक संधी नाकारल्या व आपल्या मताशी ठाम राहिले. यावेळी रामचंद्र आलूरे यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. प्रास्ताविक डॉ. सुनील रजपूत यांनी तर सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले. पाहुण्यांचा परिचय आकांक्षा मोकाशे तर आभार प्रा. विवेकानंद वाहुळे यांनी मानले. कार्यक्रमास उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, प्रा. डॉ. सुनील रजपूत, मारुती खोबरे, सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी अशोक चिंचोले, श्रीमंत मुळे, प्रा. सुभाष स्वामी, प्रा. फुलचंद दुधभाते, विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# मराठवाडा लढ्याचा इतिहास विद्यार्थ्यांनी जाणून घेतल पाहिजे – प्रा.उमाटे




**अणदूर दि. ११ (प्रतिनिधी)** देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक वर्षाने मराठवाडा भारतात विलीन झाला. क्रूर व जुलमी निजाम सहजासहजी आपले संस्थान विलीन करण्यास राजी नव्हता याबाबतचा मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याचा इतिहास भावी पिढीतील विद्यार्थ्यांनी जाणून घेण्याची गरज असल्याचे मत ज्ञानेश्वर विद्यालय लातूर येथील प्रा.भाऊसाहेब उमाटे यांनी व्यक्त केले.

येथील जवाहर महाविद्यालयात इतिहास विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले असून प्रा.उमाटे यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास या विषयावर दुसरे पुष्प गुंफताना देशाच्या मध्यभागी सर्वात मोठे असलेले हैद्राबाद संस्थान मुक्तीसाठी अनेकांनी हाल अपेष्टा सहन करीत तुरुंगवास भोगला तर अनेकांनी भारत माता की जय म्हणत हौतात्म्य पत्करले. आपसिंगा,गुंजोटी, मुस्ती,गोर्टा येथील प्रसंग सांगून हुतात्मा वेदप्रकाश हे पहिले शहीद असल्याचे स्पष्ट केले. श्रीधर वर्तक,गोविंदराव पानसरे, व्ही.पी.मेनन,आर्य समाज, एम.आय.एम,रझाकार आदीबाबत सविस्तर माहिती देत अनेक अनभिज्ञ व दुर्लक्षित बाबीवर अभ्यासपूर्ण टिप्पणी केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उमाकांत चनशेट्टी हे होते तर उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे, प्रा.सुभाष स्वामी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्रीमंत मुळे,सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी अशोक चिंचोले व शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेंद्र स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.सुनील राजपूत, सूत्रसंचालन विद्यार्थिनी पल्लवी मनशेट्टी तर आभार प्रा.फुलचंद दुधभाते यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्राचार्य चनशेट्टी यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास प्राध्यापक,विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# निजाम राजवटीत स्वामींचे योगदान मौलिक

## जवाहर महाविद्यालयाच्या व्याख्यानमालेचा समारोप



▶ **अणदूर : जवाहर महाविद्यालयात आयोजित व्याख्यानमालेत डॉ. शिरीष खेडगीकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, रामचंद्र आलुरे, मारुती खोबरे, डॉ. अशोक चिंचोले, प्रा. सुभाष स्वामी, श्रीमंत मुळे, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे.**

**संचार वृत्तसेवा**

▶ **अणदूर, दि. १० -** मातृभाषेतून शिक्षण देऊन आजन्म देशप्रेम निर्माण करण्याचे राष्ट्रीय कार्य स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले. लोककल्याण हा त्यामागील मुख्य उद्देश होता. निजाम राजवटीत स्वामींनी दिलेले शैक्षणिक योगदान खूप मौलिक असल्याचे मत डॉ. शिरीष खेडगीकर यांनी व्यक्त केले.

अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाच्या इतिहास विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी हे होते. यावेळी रामचंद्र आलुरे, मारुती खोबरे, डॉ. अशोक चिंचोले, प्रा. सुभाष स्वामी, श्रीमंत मुळे, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. सुनील राजपूत फुलचंद यांची प्रमुख उपस्थिती होती.

रामचंद्र आलुरे म्हणाले की, व्याख्यानमालेतून विद्यार्थ्यांनी विचारांची मशाल पेटवली पाहिजे. त्यांच्याकडून प्रेरणा घेतली पाहिजे. देशासाठी बलिदान दिलेल्यांचे आठवण ठेवली पाहिजे, अशा प्रकारचे विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार पाहुण्यांचा परिचय आकांक्षा मोकाशे व शेवटी आभार प्रा. विवेकानंद वाहुळे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ

# स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचा समारोप

**अणदूर, ता. १० (बातमीदार)** : जवाहर महाविद्यालय इतिहास विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचा समारोप शुक्रवारी (ता.१०) करण्यात आला आहे.

संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ या विषयावर समारोपाचे पुष्प गुंफताना डॉ.शिरिष खेडगीकर म्हणाले की, लोककल्याण हा स्वामीजींचा मुख्य उद्देश होता. मातृभाषेतून शिक्षण देऊन देशप्रेमी नागरिक निर्माण करण्याचे कार्य निजाम राजवटीत स्वामी करीत राहिले. त्यांनी आपल्या जीवनात बारा वर्षांची तपश्चर्या केली अनेकांना वाटत असे की हा साधारण संन्यासी काय मार्गदर्शन करणार आहे असे वाटत असतानाच स्वामीजी आपल्या वाणीने सभा भारून टाकत असत. ते म्हणायचे की हा भावनिक, भाषिक प्रश्न नसून मराठी माणसांच्या विकासाचा प्रश्न आहे. यासाठी संयुक्त महाराष्ट्र गरजेचे असल्याचे ठामपणे सांगायचे असे मत डॉ.खेडगीकर यांनी व्यक्त केले.

यावेळी रामचंद्र आलुरे, प्राचार्य. उमाकांत चनशेट्टी यांची भाषणे झाली. आकांक्षा मोकाशे हिने पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रास्ताविक प्रा. सुनील राऊत यांनी केले, प्रा. एम. बी. बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रा.विवेकानंद वाहुळे यांनी मानले.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस विशेषत: उमरगा शहर व तालुक्यातील जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशील जाहीर नोटीस देणार रफीक मैनोद्दीन मनियार, रा. उमरगा यांनी उमरगा येथील उसेन अ. करीम चौधरी, आयुब अ. करीम चौधरी व महताब अ. करीम चौधरी यांचेकडून त्यांचे मालकी कब्जेच्या जमिनी उमरगा येथील गट क्र. 198/2 पैकी पश्चिमेकडील 01 हे. 57.66 आर व गट


Aurangabad, OsmanabadToday
11/03/2023 Page No. 4

# अणदूर येथे व्याख्यानमालेचा समारोप



**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**अणदूर:** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचा समोरोपीय कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास डॉ. शिरीष खेडगीकर, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, रामचंद्र आलरे, मारुती खोबरे, डॉ.अशोक चिंचोले, प्रा. सुभाष स्वामी, श्रीमंत मुळे, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. सुनिल राजपूत, फुलचंद दूधभाते यांची प्रमुख उपस्थिती होती. संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ या विषयावर समारोपाचे पुष्प गुंपताना डॉ. खेडगीकर म्हणाले की, लोककल्याण हा स्वामीजींचा मुख्य उद्देश होता. मातृभाषेतुन शिक्षण देऊन देशप्रेम निर्माण करण्याचे कार्य निजाम राजवटीत स्वामी करीत राहिले. संयुक्त महाराष्ट्राचा लढा त्यांनी उभारला.अध्यक्षीय समारोप प्राचार्य चनशेट्टी यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रजपूत, सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार, पाहुण्यांचा परिचय आकांक्षा मोकाशे व शेवटी आभार प्रा. विवेकानंद वाहुळे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे
लोकमत
page- 7
10 Mar 2023



# जवाहर महाविद्यालयात महिला दिन

**अणदूर : प्रतिनिधी**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार शिवशंकर तिरगुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. चनशेट्टी, पत्रकार तिरगुळे, आदींची भाषणे झाली. महाविद्यालयातील प्रा. डॉ. मीना जाधव, प्रा. डॉ. माधुरी गडसिंग, प्रा. डॉ. सुरेखा भारती, प्रा. डॉ. मानसी स्वामी, प्रा. डॉ. दीपिका कलशेट्टी, प्रा. डॉ. ज्योती हत्तरगे व महाविद्यालयीन विद्यार्थिनींचा चन्नबसव सामाजिक संस्थेच्या वतीने अध्यक्ष शिवशंकर तिरगुळे व प्रा.डॉ. उमाकांत चन्नशेट्टी यांच्या हस्ते पेन व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सुत्रसंचालन प्रा. डॉ. राजशेखर नळगे तर आभार प्रा. डॉ. एम.बी.बिराजदार यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# जवाहर महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला

दिव्य मराठी



अणदूर| येथील जवाहर महाविद्यालयात इतिहास विभाग व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे तीन दिवसीय आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन बुधवार दि.८ रोजी प्रमुख वक्ते प्रा.अमृत महाजन योगेश्वरी नूतन विद्यालय,अंबाजोगाई यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी तर सरपंच रामचंद्र आलुरे,मारुती खोबरे गुरुजी, डॉक्टर अशोक चिंचोले, प्रा.सुभाष स्वामी,श्रीमंत मुळे गुरुजी व उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन व कार्य या विषयावर पहिले पुष्प गुंफताना अमृत महाजन यांनी रामानंद तीर्थ यांचे व्यक्तीमत्व व त्यांचे कार्य याची महती सांगितली.

# जवाहर महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ जीवन व कार्य विषयावर व्याख्यान

दै.संघर्ष



अणदूर दि ९ (प्रतिनिधी) येथील जवाहर महाविद्यालयात इतिहास विभाग व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे तीन दिवसीय आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटन बुधवार दि.८ रोजी प्रमुख वक्ते प्रा.अमृत महाजन यो-गेश्वरी नूतन विद्यालय,अंबाजोगाई यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी तर सरपंच रामचंद्र आलुरे,मारुती खोबरे गुरुजी, डॉक्टर अशोक चिंचोले, प्रा.सुभाष स्वामी,श्रीमंत मुळे गुरुजी व उपप्रा-चार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन व कार्य या विषयावर पहिले पुष्प गुंफताना अमृत महाजन म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ म्हणजे हातात काठी,भगवी दोन कफणी,कृश शरीर एवढ्याच तुटपुंज्या साधनावर बलाढ्य अशा निजामाशी त्यांनी लढा दिला. स्वातंत्र्य,समता व बंधुता नांदली पाहिजे म्हणून स्वामीजी धडपडत राहिले.अनेकांचा त्रास सहन करत इंग्रज, वतनदार,जमीनदार यांच्याशी संघर्ष करत राहिले.स्वामीजी बहुभाषा ज्ञानी तसेच विज्ञानवादी होते.तेलगू ,कन्नड,उर्दू ,मराठी,हिंदी , इंग्रजी इत्यादी भाषेवर स्वामीजींचे प्रभुत्व होते. निजामाच्या काळात सर्व प्रकारच्या संघटनांवर बंदी होती. मराठवाडा मुक्ती संग्राम एक असंतोषाचा इतिहास असून संघर्षमय प्रवास आहे. माझे संपूर्ण जीवन देश सेवेसाठी घालीन अशी प्रार्थना त्यांनी केली होती. महापुरुष,महात्मा का म्हटले जाते तर लोकांचे नेतृत्व करायचं असेल तर लोकांना समजून घेतलं पाहिजे. हातात शस्त्र न घेता एक संन्याशी लढत राहिला व तरुणांच्या पाठीशी उभा राहिला. महापुरुषांच्या जीवनात आयुष्याच्या प्रेरणा दडल्या असून आयुष्याची दिशा निश्चित करायचे असेल तर महापुरुषांना समजून घेऊ या असे आवाहन महाजन यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉक्टर उमाकांत चनशेट्टी यांनी तर प्रास्ताविक डॉ.सुनील रजपूत यांनी केले. सूत्रसंचालन फौजीया टीनवाले पाहुण्यांचा परिचय पल्लवी मनशेट्टी व शेवटी आभार डॉ.फुलचंद दूधभाते यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी सर्व प्राध्यापक, शिक्षिकेतर कर्मचारी व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्य मराठी

# भावी पिढीने आपला इतिहास जाणून घ्यावा

## प्रा. उमाटे यांचे आवाहन

प्रतिनिधी | अणदूर

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक वर्षाने मराठवाडा भारतात विलिन झाला. निजाम संस्थान विलिन करण्यास राजी नव्हता, याबाबत हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा इतिहास भावी पिढीने जाणून घ्यावा, असे मत ज्ञानेश्वर विद्यालय लातूर येथील प्रा. भाऊसाहेब उमाटे यांनी व्यक्त केले.

येथील जवाहर महाविद्यालयात तीन दिवसीय स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेत 'मुक्ति संग्रामाचा इतिहास' विषयावर प्रा. उमाटे यांनी दुसरे पुष्प गुंफले. ते म्हणाले की, हैदराबाद संस्थान मुक्तिसाठी अनेकांनी हालअपेष्टा सहन करत तुरुंगवास भोगला, हौतात्म्य पत्करले. आपसिंगा, गुंजोटी, मुस्ती, गोर्टा येथील प्रसंग सांगून हुतात्मा वेदप्रकाश हे पहिले शहीद असल्याचे सांगितले. श्रीधर वर्तक, गोविंदराव पानसरे, व्ही. पी. मेनन, आर्य समाज, रझाकार आदींची माहिती दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य उमाकांत चनशेट्टी तर उपप्राचार्य मल्लिनाथ लंगडे आदी उपस्थित होते.

लोकमत

# फूड प्रोसेसिंगबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयात फूड प्रोसेसिंग व प्रिझर्वेशन यावर आधारित एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रगती महिला मंडळाच्या अध्यक्षा संजीवनी आलुरे तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. किशोरी शहा, बालभारतीच्या सदस्य शिवकन्या कदेर उपस्थित होत्या. यावेळी डॉ. किशोरी शहा यांनी चॉकलेट्स, केक कसे बनवावे याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. महिलांचा योग्य आहार, गर्भधारणेमध्ये घ्यावयाचा आहार याबाबतही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. माधुरी गडसिंग, सूत्रसंचालन शिल्पा राठोड यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. सुरेखा भारती यांनी मानले.

# जवाहर महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ जीवन व कार्य विषयावर व्याख्यान

दै. संघर्ष




अणदूर दि ९ (प्रतिनिधी) येथील जवाहर महाविद्यालयात इतिहास विभाग व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे तीन दिवसीय आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचे उद्घाटन बुधवार दि.८ रोजी प्रमुख वक्ते प्रा.अमृत महाजन योगेश्वरी नूतन विद्यालय,अंबाजोगाई यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी तर सरपंच रामचंद्र आलुरे,मारुती खोबरे गुरुजी, डॉक्टर अशोक चिंचोले, प्रा.सुभाष स्वामी,श्रीमंत मुळे गुरुजी व उपप्राचार्य डॉ.मल्लिनाथ लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन व कार्य या विषयावर पहिले पुष्प गुंफताना अमृत महाजन म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ म्हणजे हातात काठी,भगवी दोन कफणी,कृश शरीर एवढ्याच तुटपुंज्या साधनावर बलाढ्य अशा निजामाशी त्यांनी लढा दिला. स्वातंत्र्य,समता व बंधुता नांदली पाहिजे म्हणून स्वामीजी धडपडत राहिले.अनेकांचा त्रास सहन करत इंग्रज, वतनदार,जमीनदार यांच्याशी संघर्ष करत राहिले.स्वामीजी बहुभाषा ज्ञानी तसेच विज्ञानवादी होते.तेलगू ,कन्नड,उर्दू ,मराठी,हिंदी , इंग्रजी इत्यादी भाषेवर स्वामीजींचे प्रभुत्व होते. निजामाच्या काळात सर्व प्रकारच्या संघटनांवर बंदी होती. मराठवाडा मुक्ती संग्राम एक असंतोषाचा इतिहास असून संघर्षमय प्रवास आहे. माझे संपूर्ण जीवन देश सेवेसाठी घालीन अशी प्रार्थना त्यांनी केली होती. महापुरुष,महात्मा का म्हटले जाते तर लोकांचे नेतृत्व करायचं असेल तर लोकांना समजून घेतलं पाहिजे. हातात शस्त्र न घेता एक संन्याशी लढत राहिला व तरुणांच्या पाठीशी उभा राहिला. महापुरुषांच्या जीवनात आयुष्याच्या प्रेरणा दडल्या असून आयुष्याची दिशा निश्चित करायचे असेल तर महापुरुषांना समजून घेऊ या असे आवाहन महाजन यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉक्टर उमाकांत चनशेट्टी यांनी तर प्रास्ताविक डॉ.सुनील रजपूत यांनी केले. सूत्रसंचालन फौजीया टीनवाले पाहुण्यांचा परिचय पल्लवी मनशेट्टी व शेवटी आभार डॉ.फुलचंद दूधभाते यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी सर्व प्राध्यापक, शिक्षिकेतर कर्मचारी व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
22 Mar 2023 - Page 15



## जवाहर महाविद्यालयात कार्यशाळा उत्साहात

**अणदूर, दि. २१ मार्च-**

२० मार्च २०२३ रोजी जवाहर महाविद्यालय अणदूर येथे फूड प्रोसेसिंग व प्रीजर्वेशन यावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्ष म्हणून प्रगती महिला मंडळाचे अध्यक्षा संजीवनी आलुरे व प्रमुख पाहुण्या डॉ. किशोरी शहा, बालभारतीच्या सदस्य शिवकन्या कदेर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. किशोरी शहा म्हणाल्या, चॉकलेट्स, केक्स कसे बनवावे याबद्दलची त्यांनी माहिती दिली. विविध प्रकारचे चॉकलेट्स, गव्हाच्या पिठापासून विविध बिस्किटापासून केक्स बनविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. शरबत उपलब्ध साहित्यातून बनवण्याचे प्रात्यक्षिक, सॉस कसे बनवावे प्रिझर्वेटिव्ह कोणते वापरावे याची माहिती दिली. महिलांचा योग्य आहार कसा असावा, गर्भधारणेमध्ये आहार कसा घ्यावा, रोज ताजे अन्न कसे खावे, कसे बनवावे याची अनमोल माहिती दिली. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय समन्वयक डॉ. माधुरी गडसिंग यांनी केले. सूत्रसंचालन शिल्पा राठोड व आभार डॉ. सुरेखा भारती यांनी मांनले. या कार्यशाळेला गावातील महिला विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

## फूड प्रोसेसिंगबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयात फूड प्रोसेसिंग व प्रिझर्वेशन यावर आधारित एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रगती महिला मंडळाच्या अध्यक्षा संजीवनी आलुरे तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. किशोरी शहा, बालभारतीच्या सदस्य शिवकन्या कदेर उपस्थित होत्या. यावेळी डॉ. किशोरी शहा यांनी चॉकलेट्स, केक कसे बनवावे याची प्रात्यक्षिकासह माहिती दिली. महिलांचा योग्य आहार, गर्भधारणेमध्ये घ्यावयाचा आहार याबाबतही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. माधुरी गडसिंग, सूत्रसंचालन शिल्पा राठोड यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. सुरेखा भारती यांनी मानले.

Hello Dharashiv
Page No. 4 Mar 22, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

Shikshan Prasarak Mandal, Anadur

# Jawahar Arts, Science & Commerce College, Anadur

Tal. Tuljapur Dist. Osmanabad - 413603
(NAAC Accredited) 02471-246037, 246737

# WANTED

Applications are invited from the eligible candidates for the following posts of Assistant Professor in Jawahar Arts Science & Commerce college, Anadur Tal. Tuljapur Dist Osmanabad. For the course of M.Sc. (Chemistry), M.Sc (Physics) & M.Com on non-grant basis.

| Sr.No. | Designation | Number of Posts | Qualification | Reservation |
|---|---|---|---|---|
| 01 | Chemistry | 02 | M.Sc.NET/ SET/Ph.D | Open-2 |
| 02 | Physics | 02 | M.Sc NET/SET/Ph.D | SC-I |
| 03 | Commerce | 02 | M.Com.NET/ SET/ Ph.D | VJ(a) - 1 |
| | | | | OBC - 1 |
| | | | | EWS-1 |

The application should reach to the Principal. Jawahar Arts Science and Commerce college. Anadur Tal Tuljapur Dist Osmanabad within 15 days from the date of publication of this advertisement.

Conditions Qualification will be as per norms of U.G.C. Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University. Aurangabad and Government of Maharashtra.

**Shri Bhart F. Kasture,**
**Chairman**
Shikshan Prasarak Mandal, Anadur
Tal Tuljapur Dist Osmanabad

**Shri Ramchandra (Dada) Allure**
**Secretary**
Shikshan Prasarak Mandal, Anadur
Tal Tuljapur Dist Oumanabad

**Dr. Umakant B. Chanshetti, Principal**
**Jawahar A.S.C. College, Anadur, Tal Tuljapur Dist Osmanabad**

Hello Dharashiv
Page No. 3 Mar 29, 2023
Powered by: erelego.com